cmyk

## संपादकीय

### आत्मचिंतन आणि समन्वय गरजेचा !

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर महाविकास आघाडीला आत्मपरीक्षण, आत्मचिंतन करावेच लागणार आहे. धुळीस मिळाल्यानंतर फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून पुन्हा भरारी मारायची असेल तर आत्मपरीक्षण आवश्यकच आहे. आघाडीच्या सर्वच नेत्यांना ते मान्य आहे. दारूण पराभवाचे आम्ही आघाडीतील तिन्ही पक्ष संयुक्तरित्या आत्मपरीक्षण करू, असे काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. निकालात असे काय घडले ते आम्हाला समजत नाही. हा केवळ काँग्रेस पक्षाचा पराभव नव्हता तर संपूर्ण महाविकास आघाडीचा पराभव होता त्यामुळे आम्ही एकत्र बसून आत्मपरीक्षण करू, असे वेणुगोपाल म्हणाले.

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### भारतीय संविधान लोकशाहीचा मजबूत पाया-राष्ट्रपती

नवी दिल्लीः भारतीय संविधान लोकशाहीचा मजबूत पाया आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी केले. संविधान दिनानिमित्त संसदेच्या दोन्ही सभागृहांना संयुक्तपणे संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारतीय संविधानाबद्दल आदर व्यक्त करुन संविधानाचे महत्व अधोरेखित केले. संविधान सदनाच्या (जुने संसद भवन) सेंट्रल हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभा सभापती जगदीप धनखड, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे मंचावर उपस्थित होते.

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-२१५ बुधवार दि.२७ नोव्हेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

# देशातील दूध उत्पादनात ४ टक्के वाढ

## केंद्रीय मंत्र्यांचा दावा, राष्ट्रीय दूध दिवसाच्या निमित्ताने सरकारकडून आकडेवारी जाहीर

**दिल्ली । वृतसंस्था**

**महाराष्ट्रातील दूध दरावरून दूध उत्पादक नाराजी व्यक्त करत आहेत. दूध संघांनी दूध खरेदी दर कमी केल्याचे दूध उत्पादक सांगतात. त्यावरून सध्या गोंधळ सुरू आहे. तर दुसरीकडे मात्र देशातील दूध उत्पादनात वाढ झाल्याचा दावा केंद्र सरकारकडून करण्यात आला आहे. देशातील दूध उत्पादनात ४ टक्के वाढ होऊन २०२३-२४ या वर्षात दूध उत्पादन २३९.३० दशलक्ष टनावर पोहचल्याची माहिती केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राजीव रंजनसिंग यांनी दिली. ते मंगळवारी (दि.२७) राष्ट्रीय दूध दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.**



देशात २०२२-२३ मध्ये दूध उत्पादन २३०.५८ दशलक्ष होते. परंतु दुधाची उत्पादकता वाढल्याने २०२३-२४ मध्ये दूध उत्पादन २३९.३० दशलक्ष टनांवर पोहचले. देशातील दूध उत्पादनातील सरासरी वाढ ६ टक्के आहे. तर जगाची दूध उत्पादनातील सरासरी वाढ २ टक्के आहे, असेही सिंह म्हणाले.

वर्गीस कुरियन यांच्या जयंतीदिनी दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय दूध दिवस साजरा केला जातो. त्या निमित्ताने देशातील दूध उत्पादनाची आकडेवारी सरकारकडून जाहीर करण्यात येते. देशातील प्रति व्यक्ति प्रति दिवस दूध वापराचं परांह वाढल्याच सिंग यांनी ◀◀ पान २ वर

### महाराष्ट्रात दुधाला कमी दर

महाराष्ट्रातील दूध उत्पादक दुधाला कमी दर मिळत असल्याने हैराण झाले आहेत. त्यात राज्यातील दूध उत्पादकताही उत्तर भारतातील राज्यांच्या तुलनेत कमी असल्याचे शेतकरी सांगतात.

## कागदपत्रावर डोळे झाकून सही करणारा मुख्यमंत्री बसवणार-पटोले



**दिल्ली । वृतसंस्था**

**महाराष्ट्रातील जनतेने भारतीय जनता पक्ष व त्यांच्या मित्रपक्षांना मोठे बहुमत दिले असताना मुख्यमंत्री ठरवण्यात वेळ लागण्याची गरज नाही. भाजपा युतीला महाराष्ट्राच्या जनतेची चिंता नाही, महाराष्ट्र विकणारा व्यक्ती त्यांना हवा आहे म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाडक्या उद्योगपती मित्राच्या कागदपत्रांवर डोळे झाकून सही करणारा व्यक्तीच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर नेमला जाईल, त्यामुळे उशीर होत आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्ली येथे काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत नांदेडचे नवनिर्वाचीत खासदार प्रा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्यासह महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे खासदारही उपस्थित होते. या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, आमच्या भेटीत पक्षश्रेष्ठींना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाची माहिती देण्यात आली आहे. हा निकाल अनपेक्षित आहेच पण तो जनतेलाही मान्य नाही. जनभावना वेगळ्या आहेत, त्या भावनांचा काँग्रेस पक्षाने नेहमीच आदर केला आहे. ईव्हीएममध्ये गडबड असल्याची चर्चा सुरु आहे, मत एकाला टाकले तर ते दुसऱ्याला जाते असे मतदार सांगत आहेत तर सुप्रीम कोर्ट सिद्ध करून दाखवा असे म्हणत आहे. त्यामुळे ईव्हीएमविरोधात एखादे जनआंदोलन उभारले पाहिजे, असेही नाना पटोले म्हणाले.

# आ.सुरेश धस यांच्या मंत्रीपदासाठी परमेश्वर येवले यांचा पाठपुरावा

## मुंबईत ग्रेट भेट: भाजपच्या देवेंद्रांकडून आष्टीला मिळणार न्याय

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात क्रमांक दोनचे मताधिक्य घेऊन तसेच पक्षातील वरिष्ठ नेत्याने कटकारस्थान करुन सुध्दा विजय मिळवल्याने आता भाजपच्या देवेंद्रांकडून आष्टीला न्याय मिळणार असल्याचे संकेत आहेत. आष्टीचे भुमिपुत्र व उद्योजक परमेश्वर येवले हे फडणवीस यांचे विश्वासू आहेत. येवले नाना यांनी आष्टी मतदार संघाच्या विकासासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ. सुरेश धस यांना मंत्रीपद मिळावे यासाठी पाठपुरावा सुरु केला असल्याने धस यांना मंत्रीपद मिळेल, असे मानले जात आहे. मंगळवारी परमेश्वर नाना येवले आणि आ. सुरेश धस यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.**



### धस अण्णा सारखा खमक्या मंत्री हवाच!

आ. सुरेश धस यांची काम करण्याची पध्दत संपुर्ण जिल्ह्याला माहित असून त्यांच्या याच कार्यशैलीमुळे त्यांचे जिल्ह्याच्या बाहेर सुध्दा समर्थक आहेत. जनतेची कामे करताना ते कधीही विलंब लावत नाहीत, काम कोणाचे आहे, हे कधीही पाहत नाहीत. २४ तास जनतेच्या सेवेत असतात. संकटात कोठेही आणि कधीही धावून जातात, हे सर्वांनी पाहिले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्याला धस अण्णासारखा खमक्या मंत्री हवाच, अशी आता जनभावना आहे.

विधानसभा निवडणुक ही कोणत्या मुद्दयावर होईल हे सांगता येत नव्हते. त्यातच आष्टी मतदार संघात भाजपमध्येच बंडखोरी होऊन जाणिवपुर्वक सुरेश धस यांना पराभूत करण्यासाठी डाव टाकण्यात आला होता. भाजपच्याच वरिष्ठ नेत्याने भीमराव धोंडे यांना पुढे करुन धस यांना पराभूत करण्याचा प्रयत्न केला. मात्र तेवढ्याच दिमाखात आ. सुरेश धस यांनी ७७ हजार मताधिक्याने विजय ◀◀ पान २ वर

## राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा करण्याची विरोधी पक्षांकडून मागणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या संविधान सदनातील अभिभाषणावरूनही राजकारण सुरू झाले आहे. केंद्र सरकारने संविधानाचे नियम पाळले नसल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. संविधान दिनानिमित्त राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांना पत्र लिहून केली आहे. ◀◀ पान २ वर

# ईव्हीएमविरोधात कायदेशीर लढा;वकिलांची टीम मैदानात

## शरद पवारांचा निर्धार, पराभूत आमदारांचे ऐकले गाऱ्हाणे



**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर आता महाविकास आघाडीतील पक्षाचे प्रमुख नेतेही ईव्हीएमविरोधातील भूमिकेवर एकमताने पुढे जात असल्याचे पाहायला मिळत आहे. कारण, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पराभूत आमदारांची मंगळवारी मुंबईत बैठक झाली. या बैठकीत पराभूत आमदारांनी निकालावर संशय व्यक्त करत ईव्हीएमच्या आकडेवारीवर आणि टक्केवारीवर संशय व्यक्त केला आहे. त्यानंतर, पक्षप्रमुखांनी देखील ही बाब गांभीर्याने घेत ईव्हीएमविरोधात ठोस भूमिका घेण्याचे ठरवले आह. त्यामुळे, ईव्हीएम विरोधातील लढाईसाठी विरोधकांच्या आक्रमक भूमिकेला सुरुवात झाल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे ◀◀ पान २ वर



**बीडः विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप क्षीरसागर यांचा विजय झाल्यानंतर आज शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्री निवासस्थानी आ. संदीप क्षीरसागर सह शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर व राष्ट्रवादीचे नेते राजेंद्र मस्के यांनी भेट घेऊन आशीर्वाद घेतले.**

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ नोव्हेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३.०० क्विंटल | २,८०१ | ३,११० | २,९५५ |
| ज्वारी/हायब्रिड : ४१.५० क्विंटल | १,८७० | २,८७० | २,२४६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ५,००१ | ७,७६० | ६,७३३ |
| बाजरी: ६९.५० क्विंटल | २,१७७ | ३,००० | २,६६६ |
| मुग :४.०० क्विंटल | ७,२०० | ७,४८१ | ७,३४० |
| सोयाबीन: २६६.५० क्विंटल | ३,६०० | ४,१८५ | ४,११९ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,६०० | ६,४०१ | ५,५०० |

## एकनाथ शिंदे बनले काळजीवाहू मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

विद्यमान विधानसभेची मुदत संपत आली आहे. त्याचबरोबर विधानसभा निवडणूकीशी संबधित प्रक्रियाही पूर्ण झालेली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील राज्य मंत्रिमंडळाचा राजीनामा देणे आवश्यक होते. ◀◀ पान २ वर



## ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर निवडणुका घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**महाराष्ट्रातील निवडणूक निकालानंतर देशभरात पुन्हा एकदा ईव्हीएमचा मुद्दा चर्चेत आला आहे. विरोधी पक्ष ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर अर्थात बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या, अशी मागणी करत आहेत. या दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने मतपत्रिकेवर निवडणुका घेण्याची विनंती करणारी जनहित याचिका फेटाळली आहे.**

देशातील निवडणुकांमध्ये पेपर बॅलेट मतदान प्रणाली पुन्हा सुरू करण्याची मागणी करणारी जनहित याचिका न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने फेटाळली. डॉ. के.ए. पॉल यांनी ही याचिका ◀◀ पान २ वर

# राज्यात पुढील ५ दिवस थंडीचा कडाका

## बहुतांशी भागात कमाल आणि किमान तापमानात घट

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात सध्या थंडी वाढली आहे. किमान तापमानाचा पारा कमी होत आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठात यंदाच्या निचांकी ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर राज्यातील थंडी या आठवड्यात कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला.**

राज्यात किमान आणि कमाल तापमानात घट झाली आहे. त्यामुळे राज्याला हुडहूडी भरली आहे. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठात यंदाच्या निचांकी ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर निफाड येथली गहू संशोधन केंद्रात ८.८ अंश सेल्सिअस तापमान होते. उत्तर भारतातून उत्तर दिशेने येणारे थंड वारे राज्यात प्रवेश करताना ताशी २५ ते ३० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या पूर्वीय वाऱ्यात मिसळून महाराष्ट्रात लोटले जात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात सध्या जाणवत असलेल्या थंडीचे सातत्य अजूनही पुढील पाच दिवस म्हणजे रविवारपर्यंत असेच टिकून राहणार आहे. सध्य स्थितीतील थंडीत कदाचित किंचित अधिक वाढही होऊ शकते, असा अंदाज खुळे यांनी व्यक्त केला. सध्या मुंबईसह ◀◀ पान २ वर



cmyk

अग्रलेख

# आत्मचिंतन आणि समन्वय गरजेचा !

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर महाविकास आघाडीला आत्मपरीक्षण, आत्मचिंतन करावेच लागणार आहे. धुळीस मिळाल्यानंतर फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून पुन्हा भरारी मारायची असेल तर आत्मपरीक्षण आवश्यकच आहे. आघाडीच्या सर्वच नेत्यांना ते मान्य आहे. दारूण पराभवाचे आम्ही आघाडीतील तिन्ही पक्ष संयुक्तरित्या आत्मपरीक्षण करू, असे काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. निकालात असे काय घडले ते आम्हाला समजत नाही. हा केवळ काँग्रेस पक्षाचा पराभव नव्हता तर संपूर्ण महाविकास आघाडीचा पराभव होता त्यामुळे आम्ही एकत्र बसून आत्मपरीक्षण करू, असे वेणुगोपाल म्हणाले. आम्ही झारखंड विधानसभा निवडणुकीत बाजी मारली; पण महाराष्ट्रात अपयश आले. या पराभवाची कारणमीमांसा करू, अशी प्रतिक्रिया राजदचे नेते तेजस्वी यादव यांनी दिली. महायुतीचा विजय 'अनपेक्षित' आणि 'अनाकलनीय' आहे, अशी सर्वसामान्य प्रतिक्रिया आहे. उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, राहुल गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी या निकालाचे वर्णन 'अनाकलनीय' या शब्दातच केले आहे मात्र, हा निकाल अनपेक्षित असला तरी तो अनाकलनीय आहे का याचा शोध घ्यावा लागणार आहे.

ज्या प्रकारे हा निकाल विरोधकांसाठी अनपेक्षित होता तसा तो सत्ताधाऱ्यांसाठीसुद्धा अनपेक्षित होता. एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्यातील मतदार आपल्या पाठीशी राहतील, अशी अपेक्षा सत्ताधाऱ्यांनीसुद्धा केली नव्हती. मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्ष पाहता महायुती आणि महाविकास आघाडीत अटीतटीची झुंज होईल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात मतदारांनी महायुतीच्या पारड्यात भरघोस मते टाकली. हे सारे अनपेक्षित होते; पण अनाकलनीय निश्चितच नव्हते. मुळात मतदारांच्या मन:स्थितीचे आकलन करण्यात महाविकास आघाडी कमी पडली हेच त्यांच्या पराभवाचे मुख्य कारण म्हणावे लागेल. लोकसभा निवडणुकीत राज्यातील मतदार आघाडीच्या पाठीशी उभे राहिले आणि त्या विजयाच्या धुंदीतून आघाडीचे नेते बाहेर आलेच नाहीत. या उलट महायुतीच्या नेत्यांनी त्या पराभवापासून धडा घेऊ रणनिती आखण्यास सुरुवात केली. अल्प कालावधीतही सत्ताधारी पक्षाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन मतदारांना आकर्षित केले. 'लाडकी बहीण' योजना गेमचेंजर ठरली. या योजनेमुळे महिला मतदारांचा मतदानाचा टक्का वाढला. 'लाडकी बहीण' योजनेबाबत आघाडीने धरसोड वृत्ती दाखवली त्याचाही फटका आघाडीला बसला. लोकसभा निवडणुकीतील मतदारांचा कल विधानसभा निवडणुकीतही कायम राहील, या भ्रमात आघाडीचे नेते राहिले. अडीच वर्षाच्या कालावधीत एकनाथ शिंदे सरकारने सर्वसामान्य नागरिकांना आकर्षित करणाऱ्या विविध योजना जाहीर केल्या. महिलांना एस. टी. प्रवासात अर्धे तिकिट, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, लाडकी बहीण योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून लोकांना थेट लाभार्थी करण्याचा प्रयत्न सरकारने केला. ज्या लाभार्थ्यांना थेट आर्थिक वा इतर प्रकारचा लाभ झाला त्यांनी सरकारच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षण आंदोलन महत्त्वाचे ठरले होते. विधानसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांनी ऐनवेळी कोणतीच भूमिका न घेतल्याने त्यांना मानणाऱ्या मराठा मतदारांनी त्यांना हव्या त्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे काम केले. त्याचप्रमाणे ओबीसी मतदारही महायुतीच्या पाठीशी राहिले. अजित पवार, एकनाथ शिंदे व भाजपने निवडून येण्याची क्षमता असणाऱ्या उमेदवारांनाच उमेदवारी दिली. महायुतीच्या नेत्यांनी ही निवडणूक अतिशय गांभीर्याने घेतली होती तर आघाडीचे नेते विजय आपलाच आहे या भ्रमात राहिल्याने त्यांना त्याचा फटका बसला. निवडणुकीतील निकालावरून महायुतीच्या बाजूने एक लाट तयार झाली होती असे दिसते. महायुतीतील तीन मुख्य पक्षांना मिळालेल्या जागा पाहता त्या मागे कोणताही एक समाज घटक नव्हता तर विविध समाज घटक होते असेच दिसून येते. या निवडणुकीत महायुतीने जे प्रयत्न केले त्यामुळे त्यांना भरघोस पाठिंबा मिळाला. गत काही महिन्यांतील विविध जाहिराती, मोदींच्या सभा हे घटकही त्या मागे आहेत.


जनमत हे सर्वांत महत्त्वाचे असते, त्याचा अनादर करणे महागात पडत असते. एकूणच निकाल पाहता भ्रष्टाचार, महागाई, कर्जमाफी, शेतकऱ्यांचे प्रश्न, ढासळलेली कायदा आणि सुव्यवस्था असे अनेक प्रश्न प्रचाराच्या गदारोळात गौण ठरलेले दिसले. ही स्थिति चिंताजनक म्हणावी लागेल. निवडणूक प्रचारात महायुतीने बाजी मारली. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे आघाडीला जमले नाही. असे अनेक लहान-मोठे घटक आघाडीला मारक आणि महायुतीला तारक ठरले. आघाडीला आता हातपाय गाळून चालणार नाही. जनतेचा विश्वास पुन्हा एकदा संपादन करण्यासाठी त्यांना एकमेकांत समन्वय साधून अथक मेहनत करावी लागेल.

## डॉ.बीआर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड आणि भारतीय धम्म महासंघ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त अभिवादन




बीड । प्रतिनिधी

डॉ.बी.आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड व भारतीय धम्म महासंघ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन डॉ बी आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड येथे मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. प्रसंगी प.पु. विश्व रत्न, बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर मोमबत्ती अगरबत्ती प्रज्वलित करून व पुष्पहार अर्पण करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन केले. सामुहिक बुद्ध वंदना आणि संविधान उद्धेशीकेचे वाचन करण्यात आले. संविधान दिनाच्या अनुषंगाने आयु एस एम जोगदंड व आयु अंकुश चव्हाण यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात आयु बी आर गायकवाड, सुनील जाधव, सुरेश कांबळे, रामचंद्र गायकवाड, इंजिनिअर कांबळे साहेब, अंकुश चव्हाण, एस एम जोगदंड, रितेश साळवे, सनी जाधव व वीर साहेब यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे शेवटी आयु सूरेश कांबळे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.



**बीड जिल्ह्याचे डॅशिंग नेतृत्व आ. सुरेश आण्णा धस यांचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात प्रचंड मताने निवडून आल्या बद्दल भाजपाचे युवा नेते संभाजी सुर्वे यांच्या सह मनसे जिल्हा अध्यक्ष सैलेश जाधव, भाजपा अल्प संख्याक जिल्हा उप अध्यक्ष मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए.एस.गोलु, किरण भोसले, शिवाजी चांगण ई.आदींनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.**

## आष्टी येथे १० हजार गुरव समाज बांधवांच्या उपस्थितीत १२५ बटुवरती उपनयन संस्कार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका गुरव समाज संघटनेच्या वतीने संपन्न झालेल्या राज्यस्तरीय गुरव समाज उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रमात १२५ बटूंवरती उपनयन संस्कार करण्यात आले. संपूर्ण राज्यातील गुरव समाज संघटनेच्या नेत्यांनी आदर्श घ्यावा आशा या ऐतिहासिक व देखण्या सोहळ्याचे व तो यशस्वी करणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांच कौतुक करावे तेवढे कमीच म्हणावे लागेल.

आष्टी तालुका गुरव समाज संघटनेचे अध्यक्ष भीमराव अण्णा गुरव यांच्या नेतृत्वाखाली १७ नोव्हेंबर २०२४ रोजी आष्टी येथील जोगेश्वरी मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या या राज्यस्तरीय गुरव समाज उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रम सोहळ्याच्या वेळी महाराष्ट्राच्या काना कोपऱ्या मधुन १० हजार गुरव समाज बांधव एकत्रित आले होते. राज्य भरात अल्पसंख्याक असलेल्या गुरव समाजाच्या अनेक संघटना असून समाजाचा ठेका घेणारे नेते ही मोठ्या संख्येने आहेत मात्र आष्टी तालुक्यात बोटावर मोजण्या एवढा गुरव समाज असताना आष्टी गुरव संघटना ज्या प्रकारे सामाजिक उपक्रम राबवते तसे उपक्रम राज्यात कुठेही राबवल्या जात नाहीत त्यामुळे समाज एकत्रित होत नाही. आज पर्यंत संघटनेच्या वतीने सहा वेळा राज्यस्तरीय उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रमाचे आयोजन केल्या मुळे व आता पर्यंत ७५१ बटुवर उपनयन संस्कार करण्यात आल्याने हा अनुभव पाठीशी घेऊन राज्यभरात अन्यत्र होणाऱ्या उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रमात बटूंच्या नांव नोंदणी साठी ५ हजार रुपये शुल्क आकारण्यात येत असताना आष्टी तालुका गुरव समाज संघटनेने समाजातील गोरगरीब तळा गाळातील बटुचा विचार करून नोंदणी शुल्क फक्त एक हजार पाचशे रुपये ठेवलेले होते व या मध्येच प्रत्येक बटूंना केवळ सोवळे उपरणे, टोपी, तांब्याचा गडू, ताम्हण, संध्यापळी, जानवे, मंडवळी, भिक्षावळ, झोळी, फुलांचे हार देण्यात आले होते. हा उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रम सोहळा प्रारंभ होण्या पूर्वी सर्व १२५ बटूंची आष्टी शहरातून वाद्यवृन्दासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्या नंतर राष्ट्रीय गुरव समाज संघटनेचे जेष्ठ नेते प्रतापराव गुरव, राज्य संघटक गणेश पुजारी, रामनाथ कापसे, दत्तात्रय आंबेकर, महादेव पुजारी, सुरेखाताई तोडरमल, शोभाताई फडणवीस, दिडभाई, सुनंदा शेलार, ज्योती गाडे, अनिता गुरव, संजय महाराज गुरव, गुरव गुरुजी, इत्यादी समाज बांधवांसोबत कार्यकर्ते उपस्थित होते. आष्टी तालुक्यातील गुरव समाज संघटनेच्या धडाडीच्या कार्यकर्त्यां मुळे सन २००२ साली आष्टी तालुका गुरव समाज संघटना ही संस्था रजिस्टर झाल्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या सामाजिक उपक्रमाला प्रारंभ केला. पहिल्याच वर्षी संघटनेच्या वतीने आष्टी येथे भव्य उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रमाचे आयोजन करून आपल्या कार्याची चुणूक त्यांनी दाखवून दिली. त्या नंतर दरवर्षी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा, तिळगुळ कार्यक्रम, समाजातील गरजू व्यक्तींना मदतीचा हात या सह विविध उपक्रम राबवण्याची त्यांची परंपरा आजही कायम असून सामुदायिक उपनयन संस्कार तथा मौजीबंधन कार्यक्रमाचे हे सातवे वर्ष होते. तब्बल १२५ बटू वरती उपनयन संस्कार करण्यात आल्याने मोठ्या संख्येने गुरव समाज या प्रसंगी उपस्थित होता. समाज मोठ्या संख्येने आलेला असतानाही सर्वा साठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. हा कार्यक्रम आपल्या घरचा आहे, आपल्या कुटुंबाचा आहे असे समजून बटू सोबत आलेल्या तरुण युवकानी भोजन व्यवस्थेत जेवायला वाढण्याचे श्रमदान केले असते तर भोजनाच्या वेळी नियोजनात जी थोडी गैरसोय झाली ती झाली नसती, तरीही आष्टी गुरव समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कोणाचीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न केला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी आष्टी तालुका गुरव समाज संघटनेचे अध्यक्ष भीमराव गुरव यांच्या मार्गदर्शना खाली उपाध्यक्ष बापूराव क्षीरसागर, सचिव रामभाऊ शिर्के, कोषाध्यक्ष दादा माने, सहसचिव राजेंद्र शिंदे सर, नंदू मामा गुरव, संजू मामा गुरव, देविदास गुरव, संदीप भालेराव, दत्तोबा शिर्के, रामदास क्षीरसागर, संतोष क्षीरसागर, दाही तोंडे गुरुजी, काकासाहेब भालेराव, सर्व शेलार बंधू यांच्या सह शेकडो समाज बांधवानी दिवस रात्र मेहनत करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. संपूर्ण राज्यातील गुरव समाज संघटनेच्या नेत्यांनी आदर्श घ्यावा आशा या ऐतिहासिक व देखण्या सोहळ्याचे व तो यशस्वी करणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांच कौतुक करावे तेवढे कमीच म्हणावे लागेल.

## सर्वसामान्य आणि वंचितांच्या उपेक्षीत जगण्याला संविधानाने खरा अर्थ दिला-डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीची सामाजीक परिस्थिती आणी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची परिस्थिती यात जमीन अस्मानाचा फरक लक्षात येतो याच खर कारण संविधानाची देशात अंमलबजावणी हे आहे असे प्रतिपादन डॉ राजेश इंगोले यांनी केले. तक्षशीला प्रतिष्ठान तर्फे आयोजित संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.**



यावेळी विचारमंचावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष धम्मदीप तरकसे हे होते. पुढे बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी तळागाळातील लोकांना स्वातंत्र्य मिळाले किंवा मिळाले नाही याने त्यांच्या जीवनात काहीच फरक पडणार नव्हता कारण गुलामीच्या जगण्यात फक्त मालक बदलल्याने कसलाही फरक पडणार नव्हता. परंतु स्वातंत्र्य समता बंधुता आणि समन्याय या सूत्रानुसार येथील दलित उपेक्षित वंचित वर्ग थेट समाजप्रवाहात आल्याने त्यांच्या सामाजीक आर्थिक शैक्षणिक पात्रतेत आमूलाग्र बदल घडन आला आणि सर्वसामान्य माणसाची पोर शिकून कलेक्टर, डॉक्टर, प्राध्यापक इंजिनीअर आमदार खासदार मंत्री होऊ शकले. हा सामाजीक बदल झाल्याने वंचीत लोकांच्या मनात आत्मविश्वास आला. संविधानाने महिलांना अनेक अधिकार प्राप्त करून दिले त्यामुळे महिला आज राज्यकर्त्या, शासनकर्त्या झालेल्या दिसतात ही सर्व देणं डॉ बाबासाहेब आंबेडकरानी जी कलम कायदे संविधानाच्या परिशिष्टात टाकले त्याने शक्य झाले. राज्यकारभार कसा चालवावा, नागरिकांची मूलभूत अधिकार कर्तव्य, निवडणूका, न्यायालये, शासकीय कार्यालये या देशातील प्रत्येक गोष्ट फक्त संविधानाच्या आधारे चालते हा महिमा संविधानाचा आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे संविधान देशाला अर्पण करताना एक गोष्ट बोलले होते की या जगातील सर्वश्रेष्ठ संविधान मी तयार केले आहे परंतु याचा दुरुपयोग करणारी मंडळी जर सत्तेत, आणि प्रशासनात आली तर हे संविधान दुधारी शस्त्र ठरेल. आणी नेमके हेच आज घडत आहे . राज्यपाल आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करत आहे, शासकीय संस्था सीबीआय, इडी ,यांचा सर्रास दुरुपयोग होत आहे. संविधानाने या विविधतेने नटलेल्या देशाला अखंडित ठेवण्याचे काम केले आहे त्यामुळे विविध जाती, धर्म, भाषा, प्रांत असूनही हा देश एकसंघ अखंड राहिला आहे. तसेच संविधानाने जनतेला प्रदान केलेला मतदानाचा अधिकार सर्वसामान्य जनतेला देशाचा पंतप्रधान राष्ट्रपती ठरविण्याचा अधिकार देतो असे म्हणत भारतातल्या प्रत्येक नागरिकाने संविधान वाचून, समजून घेऊन देशाचा कारभार त्याप्रमाणे सुरू आहे की नाही याचा अभ्यास केला पाहिजे असे मत डॉ राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष धम्मदीप तरकसे, सूत्रसंचालन मनीषा कांबळे तर आभार प्रदर्शन गौतम व्हटकर यांनी केले.

## झोपेच्या अभावामुळे मानसिक आरोग्य बिघडण्याचा धोका-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

**असंतुलित झोप मानसिक आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जर तुम्हाला चांगली झोप लागली नाही, तर त्यामुळे तुमचे आरोग्य तर बिघडतेच,पण त्याचा तुमच्या मानसिक आरोग्यावरही खोलवर परिणाम होतो असे डॉ.जगदीश टेकाळे यांनी सांगितले.**



झोपेचा आपल्या मानसिक आरोग्यावर काय परिणाम होतो? हा आपल्यासाठी एक अतिशय महत्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे.आणि कदाचित ही अशी गोष्ट आहे ज्याकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो.आपण त्याकडे फारसे लक्ष देत नाही,पण ज्याप्रमाणे एखाद्या गॅझेटला रिचार्ज करण्यासाठी वेळ लागतो, त्याचप्रमाणे आपल्या मेंदूला ताजेतवाने होण्यासाठी झोपेची गरज असते, जेणेकरुन तो त्याच्या योग्य कार्यात परत येऊ शकेल.झोप न येण्याची अनेक कारणे असू शकतात.जर तुम्हाला झोप येत नसेल किंवा झोप कमी होत असेल तर त्याचे मानसिक आणि शारीरिक परिणाम गंभीर होऊ शकतात, याकडे डॉ.टेकाळे यांनी लक्ष वेधले. झोपेच्या कमतरतेचा मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. उदाहरणार्थ,जर तुम्हाला पुरेशी झोप मिळाली नाही, तर तुम्ही चिडू शकता किंवा तुमची संज्ञानात्मक कार्ये कमी होऊ शकतात. उदारहणार्थ-एकाग्रता,स्मरणशक्ती कमी होणे आणि कामे पूर्ण करण्यात अडचणी येऊ शकतात. कमी झोपेचा आपल्या भावनिक स्थितीवर खोल परिणाम होतो.ज्याप्रमाणे झोप आपल्याला शारीरिकरीत्या बरे होण्यासाठी वेळ देते, त्याचप्रमाणे आपल्या भावनांना बरे करण्यासाठी देखील वेळ देते. झोपेच्या कमतरतेदरम्यान तणावपुर्ण परिस्थितीबद्दल आपली नकारात्मक प्रतिक्रिया वाढते. जेव्हा आपण झोपेच्या कमतरतेने त्रस्त असतो, तेव्हा आपली नकारात्मक विचारसरणी देखील वाढते, असे अनेक संशोधनामध्ये म्हटले आहे. परिणामी,तुम्हाला चिंता किंवा नैराश्य वाटू शकते. आपल्याला चांगली झोप येत नसेल,तर मानसिक आरोग्य तज्ज्ञाशी संपर्क साधणे आवश्यक आहे. मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी झोप खूप महत्वाची आहे. प्रत्येक व्यक्तीच्या झोपेच्या गरजा वेगवेगळ्या असतात. जर सात तासांची झोप हवी असले, तर तेवढीच झोप तुमच्यासाठी पुरेशी आहे असे नाही.कदाचित ८ तास किंवा ६ तासांची झोप तुमच्यासाठी पुरेशी असू शकते, असे डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे म्हणाले. डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

## पान १ वरून...

### देशातील दूध उत्पादनात

सांगितलं. सिंग म्हणाले, ''देशातील प्रति व्यक्ति प्रतिदिवस दूध वापर २०२२-२३ मध्ये ४५९ ग्रॅम होतं. परंतु त्यामध्ये वाढ होऊन २०२३-२४ मध्ये प्रति व्यक्ति प्रति दिवस दूध वापर ४७१ ग्रॅमवर पोहचल्याचा दावाही सिंह यांनी केला आहे. सिंग यांनी दुग्धजन्य पदार्थाच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्याची गरजही व्यक्त केली. २०३० पर्यंत देशातील पशुधन लाळ्या आणि खुरकुत रोग मुक्त होईल. त्यातून दूध निर्यातही वाढेल, असा विश्वास सिंग यांनी व्यक्त केला. सिंग म्हणाले, दूध उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन दूध उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यातून उत्पन्न वाढेल आणि मध्यस्थी दूर करता येतील, असेही सिंग म्हणाले.

---------

### फडणवीसांकडे परमेश्वर येवलेंचा

मिळवला. गेल्या १० वर्षात आष्टी मतदार संघात जनतेच्या विकासाची कामे अपेक्षेप्रमाणे झाली नाहीत. विकासाचा अनुशेष मोठा असल्याने तो भरुन काढण्यासाठी आष्टीला मंत्रीपद मिळावे, अशी मतदार संघातील जनतेची प्रमाणिक मागणी आहे. जनतेची भावना आणि विकासाचा अनुशेष डोळ्यासमोर ठेऊन सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक परमेश्वर नाना येवले यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ. सुरेश धस यांना मंत्रीपद मिळावे, यासाठी पाठपुरावा सुरु केला आहे. येवले नानांच्या शब्दाला फडणवीस यांच्याकडे किमत असल्याने भाजपचे देवेंद्र मंत्रीपद देऊन आष्टीला न्याय देतील, असा विश्वास आता मतदार संघातील नागरीकांना आहे. परमेश्वर नाना येवले आणि आ. सुरेश धस यांनी मंगळवारी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. त्यातच आता आष्टीला पक्षाकडून न्याय मिळणार असल्याचे म्हटले जात असून आ. सुरेश धस यांना मंत्रीपद मिळेल, असे बोलले जात आहे.

---------------------

### ईव्हीएमविरोधात कायदेशीर

राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड हे १ लाखांच्या मताधिक्याने विजयी झाले असूनही त्यांनी ईव्हीएमला प्रकर्षणाने विरोध दर्शवला. तर, शरद पवार आणि उद्धव ठकारेंनीही मोठे आंदोलन उभे करण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत उमेदवारांनी केलेल्या तक्रारी संदर्भात एक वकिलांची टीम करण्याचा निर्णय पक्षाचे प्रमुख शरद पवारांनी घेतला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून राज्यपातळीवर एक आणि केंद्रीय पातळीवर एक कायदेशीर लढाई लढण्यासाठी वकिलांची टीम गठित करण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. शरद पवारांकडून केवळ आरोप करण्यापेक्षा ईव्हीएमबाबत जे आक्षेप आहेत किंवा निवडणूक प्रक्रियेत ज्या चुकीच्या बाबी घडल्या ते सर्व पुरावे गोळा करण्याच्या सूचना देखील उमेदवारांना देण्यात आल्या आहेत.

**इंडिया आघाडी देखील लढा उभारणार**

उमेदवारांना २८ तारखे पर्यंत व्हीव्हीपॅट तपासणीसाठी वेळ असल्याने उमेदवारांनी तत्काळ व्हीव्हीपॅट तपासणी करावी, अशीही सूचना सर्वच पराभूत उमेदवारांना बैठकीत करण्यात आली आहे. त्यासंदर्भातील पत्राचा एक नमूना देखील शेअर करण्यात आला आहे. राज्य पातळीवर ज्या प्रकारे या लढाईला सुरूवात करण्यात आली, त्याचप्रमाणे इंडिया आघाडी देखील लढाई लढणार असल्याची माहिती शरद पवारांनी उमेदवारांना दिली आहे. तर, आता मागे हटायचे नाही, लढायचे, असा ऊर्जात्मक संदेशही शरद पवारांनी पराभूत उमेदवाराना दिला आहे. त्यामुळे, ईव्हीएमविरोधातील लढाई आता तीव्र होणार असल्याचे दिसून येत आहे.

------------

### ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर निवडणुका

दाखल केली होती. याचिकाकर्त्याने म्हटले की चंद्राबाबू नायडू आणि वाय.एस. जगन मोहन रेड्डी यांसारख्या नेत्यांनीही इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) छेडछाडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यावर खंडपीठाने म्हटले की, जेव्हा चंद्राबाबू नायडू किंवा रेड्डी हरले तेव्हा ते म्हणतात की ईव्हीएममध्ये छेडछाड झाली आहे. जेव्हा ते जिंकले तेव्हा ते काहीही बोलत नाहीत. ईव्हीएममध्ये छेडछाड होत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट सांगितले. याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे की, ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाऊ शकते आणि भारताने ईव्हीएमऐवजी मतपत्रिका वापरणाऱ्या युनायटेड स्टेट्ससारख्या देशांच्या पद्धतींचे पालन करावे. ईव्हीएममुळे लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे, इलॉन मस्क सारख्या व्यक्तींनी देखील ईव्हीएम छेडछाडीवर चिंता व्यक्त केली असल्याचे याचिकेत म्हटले आहे. निवडणुकीदरम्यान पैसे, दारू आणि इतर प्रलोभने वाटण्यात दोषी आढळल्यास उमेदवारांना किमान पाच वर्षांसाठी अपात्र ठरवण्याचे निर्देश जारी करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. निवडणुकीत लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी मतदार शिक्षण कार्यक्रम, राजकीय पक्ष निधीची छाननी करण्यासाठी तपास यंत्रणा, निवडणुकीशी संबंधित हिंसाचार रोखण्यासाठी धोरणात्मक चौकट तयार करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली होती.

-------------

### राज्यात पुढील ५ दिवस

कोकण वगळता संपूर्ण महाराष्ट्रात दुपारचे कमाल तापमान २८ तर पहाटेचे किमान तापमान १३ अंश सेल्सिअसच्या दरम्यान आहे. ही दोन्हीही तापमाने भागानुसार सरासरीपेक्षा दोन चार अंशाने खालावलेले आहेत. त्यातही नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, गोंदिया, भंडारा, नागपूर आणि अकोला ह्या जिल्ह्यांत किमान तापमानाचा पारा १० ते १३ अंशापर्यंत घसरला आहे. मुंबईसह कोकणातील कमाल तापमान मात्र ३० अंशाच्या आसपास आहे, असे खुळे यांनी सांगितले. कन्याकुमारीजवळील हवेच्या कमी दाबाचे जास्तीत जास्त अतितीव्र कमी दाबापर्यंत विकसनाची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी चक्रीवादळ वा पावसाची भिती बाळगू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

-----------

### एकनाथ शिंदे बनले

त्यानुसार मंगळवारी मंत्रिमंडळाचे प्रमुख या नात्याने मुख्यमंत्री पदाचा एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा देत संपूर्ण राज्य मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. राज्यपाल यांनी एकनाथ शिंदे यांची काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती केली आहे.

--------

### राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर

काँग्रेसच राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी राज्यसभेच्या सभापतींना पत्र लिहीले आहे. तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून संविधानावर चर्चेची मागणी केली आहे. यासंदर्भात राज्यसभा खासदार दिग्विजय सिंह म्हणाले की, प्रत्येकाला संविधानाची प्रस्तावना शिकवण्यात आली आहे. पण त्याची योग्य अंमलबजावणी होत आहे का? लोकांना न्याय, स्वातंत्र्य मिळतंय का? अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे का? बंधुभाव कुठे आहे? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव न घेता त्यांनी उपरोधिकपणे म्हटले की, केवळ संविधानापुढे नतमस्तक होऊन संविधानाचे पालन होणार नाही. जेव्हा प्रत्येक समाजातील प्रत्येक नागरिकात आत्मविश्वास निर्माण होईल तेव्हा हे घडेल.



बदनापूरचे आमदार नारायण कुचे हे प्रचंड मतांनी निवडून आल्याबद्दल मुंबई येथे त्यांची शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या यावेळी राजेंद्र लाड रामेश्वर दराडे भगवान आंबोरे प्रमोद वाघमारे कैलास चव्हाण यांची उपस्थिती होती

# जल प्रकल्पातील पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे -विभागीय आयुक्त दिलीप गावडे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर विभागातील प्रकल्पातील पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त तथा कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष दिलीप गावडे यांच्या अध्यक्षतेखाली जायकवाडी प्रकल्प, नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प, निम्न दुधना प्रकल्प, माजलगाव प्रकल्प, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, पूर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर प्रकल्प), मांजरा प्रकल्प, निम्न तेरणा प्रकल्प, सिना कोळेगाव प्रकल्प या नऊ मोठया प्रकल्पावरील सिंचन तसेच पाणी नियोजनासाठी कालवा सल्लागार समितीची (शासकीय सदस्यांची) बैठक आज विभागीय आयुक्त कार्यालयात झाली. यावेळी दूरदृष्य प्रणालीव्दारे सबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच सबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकस्थळी मुख्य अभियंता लाभक्षेत्र तथा सदस्य जयंत गवळी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) चे अधीक्षक अभियंता सं. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पल्लवी जगताप, महसूल उपायुक्त नयना बोंदर्डे, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.१ चे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राकेश गुजरे, जायकवाडी पाटबंधारे विभाग जालनाचे कार्यकारी अभियंता सुरेखा कोरके, लाभक्षेत्र पाटबंधारे विभाग क्र.-१ लातूरचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, धाराशिव पाटबंधारे विभाग क्र-१ चे कार्यकारी अभियंता अ.ना.मदने, उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त श्री गावडे म्हणाले, पाऊस चांगला झाल्याने आपल्या विभागातील बहुतांश प्रकल्पात चांगला पाणीसाठा आहे. त्यामुळे या पाण्याचे पिण्यासाठी, शेतीसाठी तसेच उद्योगासाठी सूक्ष्म नियोजन करावे. पाणीटंचाई भासणार नाही तसेच टँकरची गरज पडू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केंली. जलसंपदा विभागासह जिल्हा प्रशासनाने सूक्ष्म पाणी नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सं. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पल्लवी जगताप तसेच प्रणालीव्दारे नांदेडचे अधीक्षक अभियंता अजय दाभाडे यांनी प्रकल्पातील सद्यस्थिती व नियोजनाबाबत माहिती दिली. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत सिंचन प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात आले असून संबंधीत जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या यानंतर यानंतर होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय करण्यात येणार असल्याचेही ठरले.

जायकवाडी प्रकल्पातून आज रब्बीचे पहिले आवर्तन- जायकवाडी धरणामध्ये २१७१.०० दलघमी (१००.००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. जायकवाडी डाव्या कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन आज २५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सोडण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, बीड व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.



## कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरले रब्बी- उन्हाळी पाण्याचे नियोजन

नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प: रब्बी हंगामातील दोन पाणी आवर्तने डिसेंबरअखेर- नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाशिक जिल्ह्यातील मुकणे, भाम, भावली व वाकी या चार धरणामध्ये ३०३.३८ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. नांदूर मधमेश्वर कालवा मुखाशी सिंचनासाठी उपलब्ध पाणीसाठयावर रब्बी हंगामात दोन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित केलेले असून सदर आवर्तने अनुक्रमे डिसेंबर अखेर व फेब्रुवारी महिन्यात गोदावरी डावा व उजवा कालवा समवेत घेणे प्रस्तावित आहे. छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. उन्हाळी हंगामातील आवर्तनाबाबत निर्णय पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कालवा सल्लागार बैठकीत घेण्यात येणार आहे.

निम्न दुधना प्रकल्प: रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन पाणी आवर्तन प्रस्तावित- निम्न दुधना प्रकल्पामध्ये १८१.७८० दलघमी (७५%) उपयुक्त पाणीसाठा झालेला असून धरणावर अवलंबून असलेल्या सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित केले आहे. कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. जालना व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

माजलगाव प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार- या वर्षी धरणामध्ये २६३.२० दलघमी (८४.३५%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. याचा लाभ बीड व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना होणार आहे.

ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प: रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन प्रस्तावित

ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पामध्ये ९६४.१० दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. याचा लाभ यवतमाळ, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना होणार आहे.

पूर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर धरण) : रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे चार व चार पाणी आवर्तन

पूर्णा प्रकल्पामध्ये ८९०.७३ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे चार व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन आज २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. परभणी, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

मांजरा प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन २० डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार-मांजरा

# भारतीय संविधान हे खऱ्या अर्थाने लोकशाहीची रुजवणूक करणारे संविधान आहे- ज्ञानेश मातेकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतात एकता,एकात्मता आणि बंधुता कायम राहावी.भारतातील लोकशाहीचा आदर्श सर्व जगाने घ्यावा यासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमातून भारतीय संविधानाची निर्मिती केली.त्यांनी निर्माण केलेले भारतीय संविधान हे खऱ्या अर्थाने लोकशाहीची रुजवणूक करणारे संविधान आहे असे विचार जेष्ठ शिक्षक तथा इतिहास अभ्यासक ज्ञानेश मातेकर यांनी मांडले.



दि.२६ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात संपन्न झालेल्या संविधान दिन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पूजन करण्यात आले.तसेच संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक मातेकर यांनी संविधानाची जडणघडण याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.तसेच बाबासाहेबांनी भारतीय संस्कृती,भाषा,प्रांत,समाज,शिक्षण इ बाबींचा सखोल विचार करून संविधान निर्माण करण्यासाठी विविध देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला आणि खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही नांदावी अशी राज्यघटना निर्माण केली असे मत शेवटी त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून सर्व विद्यार्थ्यांनी संविधान ग्रंथाचे अवलोकन आणि वाचन केले.तसेच याप्रसंगी मुंबई येथे दि.२६ नोव्हेंबर २००८ रोजी झलेल्या आतंकवादी हल्ल्यातील शाहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक नितीन चौधरी यांनी केले. सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला.

# आमदार सुरेश धस यांची विनाकारण बदनामी करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा - धस समर्थक

पाटोदा । प्रतिनिधी

मा.आमदार सुरेश रामचंद्र धस (आमदार आष्टी पाटोदा शिरूर) सावरगाव (चकला) ता. शिरूर (का) येथे पुतळा जाळून, बदनामीकारक वक्तव्य करून, दूषित हेतूने दोन समाजात दरी पडावी व अफवा हे फैलावून दोन समाजामध्ये भांडत तंटे व्हावेत या हेतूने सोशल मीडिया वापरून पुतळा जाळला व बेकायदेशीर जमाव जमा केला जमाव करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करावे.



अशी मागणी पाटोदा तहसीलदार आणि पाटोदा पोलीस ठाण्यात आमदार सुरेश धस समर्थकांकडून निवेदन देऊन मागणी करण्यात आली.सविस्तर वृत असे आहे की मौजे सावरगाव (चकला) ता. शिरूर कासार येथे काल रविवारी दुपारी ११:०० वाजता १) केशव धर्मराज खेडकर २) पोपट मुरलीधर खेडकर ३) पांडुरंग रामनाथ खेडकर ४) सुनील शेषेराव खेडकर ५) श्रीराम बाबासाहेब खेडकर ६) बाळासाहेब भास्कर खेडकर ७) मनोज जगन्नाथ खेडकर ८) ऋषिकेश प्रकाश सांगळे ९) शंतनु संजय खेडकर १०) संदीप निवृत्ती बागर ११) प्रवीण पोपट खेडकर व मौजे पाडळी ता. शिरूर कासार येथील विठ्ठल कंठाळे मो. नं. ८७८८७४५०८८ या नंबर वरून मोबाईल क्लिप व्हायरल करून वरील सर

पान ६ वरून...

## राजेभाऊ फड यांच्याकडून

विधानसभा मतदारसघातील मौजे कन्हेरवाडी गावातील रोहिदास विठ्ठल रोडे व दिलीप ज्ञानोबा मुंडे यांच्या मुलीच्या विवाहासाठी सरपंच तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांच्या वतीने प्रत्येकी ११००० रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन मिनिनाथ दादा फड, ग्रा.प.सदस्य प्रल्हाद गित्ते, ग्रा.प.सदस्य प्रशांत रोडे, मधुकर मुंडे, पिंटू फड वाघ, महादेव मामा मुंडे, श्रीकृष्णा फड, समाधान मुंडे आदी ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## मनोज जरांगे यांच्याकडून

दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी आजारपणामुळे निधन झाले. ते आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक सतिष शेळके यांचे मामा होत. याबाबत माहिती मिळाल्यानंतर मराठा संघर्ष योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी दैठण येथे जाऊन सचिन पंडित यांची व कुटुंबीयांची सांत्वन भेट घेतली. या दुःखातून सावरण्याची ईश्वर आपणास शक्ती देवो अशी प्रार्थना नगद नारायणाचरणी मनोज जरांगे पाटील यांनी केली. यावेळी पंडित परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## अखिल भारतीय मराठी पत्रकार

अत्यंत मनमिळाव स्वभाव म्हणून त्यांची ओळख होती. बीड शहरांमधून कामकाज आटवून गावाकडे परतत असताना दुचाकी अपघातामध्ये ते गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. मंगळवारी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी नागापूर येथे पत्रकार साळुंके यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी परिषदेचे राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, परिषदेचे विभागीय संघटक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे, तालुका कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, संपादक सहस आदोडे, संपादक सलामत पठाण, यांच्यासह ग्रामस्थ दिलावर पठाण विठ्ठल साळुंके, राहुल साळुंके आदी उपस्थित होते.

## धारूर शहरातील महायुतीच्या

अजित पवार गटाच्या व महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आधीच आत्मपरीक्षण करावे अन्यथा धारूर शहरातील निकाल धक्कादायक लागतील.

माजलगाव विधानसभा निवडणुकीत धारूर शहरात प्रमुख चौरंगी लढत पाहायला मिळाली प्रमुख चार उमेदवारांना धारूर शहरात पुढील प्रमाणे मतदान मिळाले. प्रकाश सोळंके १७६०, मोहन जगताप ३२०७, माधव निर्मळ ३३६३, रमेश आडसकर २२०७ एवढी मत मिळाली

## कार्यकर्ता संवाद बैठकीत माजी

माजी आ. बाळासाहेब आजबे काका यांनी शिराळ येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते या मेळाव्यासाठी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते यादरम्यान गावागावातून आलेल्या कार्यकर्त्यांनी पराभवाचे कारण देत विचार मंथन केले तर उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना माजी आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की आपला पराजय झाला आहे जनतेने आपल्याला नाकारले आहे हे आपण मान्य केले पाहिजे परंतु हा पराभव कशामुळे झाला हेही जनतेला माहिती आहे संपूर्ण महाराष्ट्रात झालेली निवडणूक ही जनतेने पाहिली आहे आपण केलेले विकासकामे ही जनता नक्कीच विसरू शकणार नाही आपला झालेला पराभव हा कशामुळे झाला आहे हे या ठिकाणी मी जरी सांगितले नाही तरी सर्वसामान्य जनतेला ते माहिती आहे त्यामुळे त्या खोलात मी जाणार नाही परंतु झालेला पराभव हा मान्य करून आपण सर्वांनी उद्यापासून नव्या जोमाने नव्या ताकतीनिशी सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी राजकारणात टिकून राहिले पाहिजे त्यासाठी उद्यापासून आपण जोमाने कामाला लागावे झालेल्या चुका कशा सुधारता येतील याकडे लक्ष देऊन गावागावात कार्यकर्ते जोडण्याचे काम करावे येणाऱ्या अडचणीला मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे कुठलीही चिंता भीती मनामध्ये न बाळगता आपण आपले सामाजिक काम सुरू ठेवावे निवडणूक म्हटले की जय पराजय आलाच परंतु ज्या पद्धतीने ही निवडणूक झाली ती लोकशाहीला धरून नाही एवढेच मी या ठिकाणी सांगेल येणाऱ्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आपण सर्वजण आपल्या गावातील सर्वसामान्य जनतेशी नाळ जोडावी त्यांची लहान मोठे कामे करावीत व कार्यकर्ते कसे वाढतील याकडेही लक्ष दिले पाहिजे आपण प्रत्येक गावामध्ये जे विकासकामे केले आहेत ते विकास कामे सर्वसामान्य जनतेच्या नजरेस आणून द्या एवढी विकास कामे या अगोदरही कोणी केली नाहीत आणि यापुढेही कोणी करणार नाही असे मी ठामपणे या ठिकाणी सांगतो त्यामुळे आपली उणीव जनतेला नक्कीच भासणार आहे असे असले तरी आपणही कशात कमी पडता कामा नये झालेल्या चुका सुधारून नव्या जोमाने सर्वांनी कामाला लागावे येणारा काळ आपलाच आहे असा विश्वास यावेळी आमदार बाळासाहेब आजबे यांनी व्यक्त केला या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पाटोदा तालुका अध्यक्ष दीपक दादा घुमरे, विश्वास भाऊ नागरगोजे काकासाहेब शिंदे धैर्यशील थोरवे युवक तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले पंडित पोकळे परसराम मराठे हरिभाऊ दहातोंडे नगरसेवक बाबुराव जाधव महादेव डोके अर्जुन काकडे बाबा भिटे अजिनाथ गळगटे फौजी नगरसेवक नाजीम शेख सरपंच पोपट शेकडे बबन रांजणे सिद्धेश्वर झांजे दादासाहेब डोके बाळासाहेब पिसाळ यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या बस सेवा सुरु करा–बाबासाहेब कोलते

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या आराम, ईलेक्ट्रीकॅल्स, शिवशाही बस सेवा सुरु करून जिल्ह्यातील भाविकांना प्रभू श्रीरामाचे दर्शनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्वातंत्र सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोलते यांनी विभाग नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



विभाग नियंत्रक यांना दिलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हंटले आहे की, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या आराम, इलेक्ट्रिकल्स, शिवशाही बस सेवा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून सुरु करावी, कारण छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा धार्मिक व साधू संतांची भूमी म्हणून ओळखली जातो, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनेक धार्मिक संस्थाचे कामे मोठ्या प्रमाणावर होत असून जिल्ह्यात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून आयोध्याला जाण्यासाठी सध्याची परिवहन व्यवस्था जास्त प्रमाणात खासगी स्वरुपाची असून सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी नाही. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर आगारातून छत्रपती संभाजीनगर ते आयोध्या आराम बस, इलेक्ट्रिकल बस व शिवशाही बस सेवा सुरु केल्यास छत्रपती संभाजीनगर आणि शेजारच्या जिल्ह्यातील भाविक पर्यटक यांच्यासाठी लाभदायी ठरेल त्याचबरोबर परिवहन महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल.

निवेदनाचा व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भाविकांचा हिताचा विचार तात्काळ होऊन छत्रपती संभाजीनगर ते आयोध्या बस सेवा सुरु करावी अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

# महात्मा फुले पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने संविधानदिनी २०० संविधानाचे वाटप

बीड । प्रतिनिधी

दि २६/११/२०२४ रोजी संविधान दिवस महात्मा फुले पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतसंस्था बीड येथे साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्था चे अध्यक्ष एस. बी. राख, सचिव एस. एल. बनकर व सर्व संचालक मंडळ यांनी महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे ला पुष्पहार घालून अभिवादन केले.



संविधान दिनी संस्थे च्या सर्व सभासदांना भारतीय संविधान भेट देण्याची संकल्पना संस्थेचे सचिव संतोष बनकर यांनी मांडली होती. त्यास अध्यक्ष एस. बी. राख व सर्व संचालक मंडळ यांनी अनुमोदन दिले होते .त्या नुसार २००संविधान सर्व सभासदांना वाटप करण्यात आले. या प्रसंगी संविधानाचे महत्व व संविधानाने दिलेले हक्क, अधिकारा विषयी तसेच संविधान वाचून कायद्याचा अभ्यास करण्याचे मनोगत संतोष बनकर यांनी व्यक्त केले.तसेच संस्थेचे मयत सभासद यांच्या पत्नीला संस्था मार्फत दिलेल्या विम्याचा लाभ रु ५लक्ष चा चेक व संस्था मार्फत ५००० चे आर्थिक सहाय्य करण्यात आले, दुसरे मयत सभासद रघुनाथ यांच्या कुटूंबाला संस्थेच्या वतीने ५००० आर्थिक सहाय्य देण्यात आले.या कार्यक्रमास संचालक बेग, नंदकुमार खामकर, ज्योती भिंगले, शीतल केदार यांच्या सह सभासद उपस्थित होते.

# ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाड्या व वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावा

## पुरोगामी पत्रकार संघाने निवेदनाद्वारे केली केज तहसिलदार यांच्याकडे मागणी

**सारणी । प्रतिनिधी**

केज तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. दोन्ही कारखाने सुरु झाले आहेत, ऊस उत्पादक शेतकर्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. पण रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या बहुतांश वाहनांच्यापाठीमागे रेडियम अथवा रिफ्लेक्टर लावलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कारखाना संचालक यांनी याची सक्ती करुन होणारे अपघात टाळावेत.



दिवसेंदिवस रोडवरील अपघातांची संख्या वाढत आहे. वाढती अपघाताची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमांची जनजागृती तसेच त्यावर विविध उपाययोजना होणे गरजेचे आहे. सद्या साखर कारखाने सुरु झाले आहेत. रात्रीच्या वेळी ऊस वाहतूक करणार्या वाहनांमुळे अनेक अपघात झालेली आहेत. या अपघातामध्ये अनेक निष्पाप बळी गेलेले आहेत. त्यामुळे साखर कारखानदार यांनी कारखान्यावर येणाऱ्या प्रत्येक ऊस वाहतूक वाहनांच्या मागे रेडियम, रिफ्लेक्टर लावणे सक्तीचे करावे. तसेच वाहतूक विभागाकडून वाहतूक नियमांचे पालन न करणारऱ्या ऊस वाहतूक वाहनांवर कडक कार्यवाही होणे गरजेचे आहे. तसेच ऊस वाहतूक करणार्या वाहन चालकाने वाहतूकीच्या नियमाचे काटेकोटरपणे पालन करुन वाहनांना रेडियम, रिफ्लेक्टर लावण्याबाबत वाहन चालक व मालक यांना सुचना देण्यात याव्यात अशी मागणी पुरोगामी पत्रकार संघ केज यांनी आज तहसील कार्यालय येथे निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले, केज तालुका अध्यक्ष रणजित घाडगे, केज तालुका सचिव दिनकर जाधव, पत्रकार जयद्रथ गायकवाड यांची उपस्थिती होती.

ऊस वाहतूक करणारे वाहने सद्या रोडवर बर्याच ठिकाणी रात्रीच्या वेळी बंद पडलेल्या आवस्थेत पहावयास मिळत आहेत. परंतु अशा वाहनांना रेडियम किंवा रिफ्लेक्टर लावलेले नसतात, यामुळे अपघात घडतात आणि यामाध्ये निष्पाप वाहनधारकांचे नुकसान होते. त्यामुळे आम्ही केज तहसिलदार यांच्या कार्यालयास निवेदणाद्वारे उचित कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

-दिनकर जाधव, सचिव-पुरोगामी पत्रकार संघ ता.केज

केज तालुक्यातील युसुफ वडगाव जवळ दि.२४ नोव्हे.रोजी रात्री ऊसाने भरलेली बैलगाडी न दिसल्यामुळे एक अपघात झाला असुन मोटारसायकल धारकाचे नाकाचे हाड व छातीच्या फासुळ्या मोडल्या आहेत. सदरील इसम गोटेगाव येथील असुन, त्याला उपचारासाठी बार्शी येथे हलवन्यात आले आहे. जर बैलगाडीला पाठीमागून रेडीयम असते तर अपघात घडला नसता. अशी चर्चा परिसरातील नागरिक करत आहेत.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि. २७ नोव्हेंबर २०२४


# शेतजमीन तयार करण्यासाठी कल्टीवेटर यंत्राचा वापर

मुंबई : सध्या रब्बी पिकांच्या पेरणीचा हंगाम सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी त्यांचे शेत तयार करण्यास सुरुवात केली आहे. कल्टीवेटर हे शेतकऱ्यांना शेताच्या तयारीसाठी आवश्यक असलेल्या कृषी उपकरणांपैकी एक आहे. कल्टीवेटर हे एक कृषी यंत्र आहे जे ट्रॅक्टरच्या मदतीने चालवले जाते आणि शेतात नांगरणी करण्यासाठी वापरले जाते. या कृषी यंत्राच्या साहाय्याने शेतकरी कमी वेळात आणि श्रमात आपले शेत तयार करू शकतात. या उपकरणाद्वारे शेतकरी दोन कामे करू शकतात, एक शेत नांगरणे आणि दुसरे तण नियंत्रित करणे. अशाप्रकारे या यंत्राद्वारे दोन कामे सहज करता येतात आणि उत्पन्न वाढवता येते. विशेष म्हणजे शेतकऱ्याच्या खरेदीवर शासनाकडून अनुदानाचा लाभही दिला जातो.

टाईन टाइप कल्टीवेटरची वैशिष्ट्ये : टाईन टाइप कल्टिव्हेटरमध्ये ९ ते १३ टायन्स असतात. त्याच्या मदतीने जमीन नांगरून शेतीसाठी तयार करता येते. कल्टिवेटरची मुख्य वैशिष्ट्ये किंवा उपयोग खालीलप्रमाणे आहेत. टाईन टाइप कल्टिव्हेटरचा वापर मुख्यतः कोरड्या आणि दमट जमिनीवर शेतात पेरणीसाठी केला जातो. या कृषी अवजारात लोखंडी चौकटीला लहान धारदार कुंडले जोडलेले असतात. याच्या मदतीने ओळींमध्ये ठराविक अंतरावर पिकांची पेरणी केली असेल तर तण काढणे व खुरपणी करण्याचे काम करता येते. नांगरलेल्या शेतात कल्टिवेटरचा वापर केल्याने शेतातील गवत नष्ट होऊन माती भुसभुशीत होते आणि जमिनीखाली गाडलेले मातीचे गड्डे वर येऊन तुटतात. कल्टिव्हेटरचा वापर मळणीसाठी सुद्धा केला जातो.कल्टिव्हेटर चालवण्यासाठी किती एचपी ट्रॅक्टर लागेल? : ट्रॅक्टरला जोडून कल्टिवेटर चालवले जाते. ते चालवण्यासाठी ३५ हॉर्स पॉवर किंवा त्याहून अधिक हॉर्स पॉवरचा ट्रॅक्टर लागतो. हे ३५ पेक्षा जास्त च्या ट्रॅक्टरने शेतात सहज चालवता येते. कल्टीवेटरवर किती सबसिडी मिळते? केंद्र सरकारद्वारे कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत उप अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना शेतीमालावर अनुदानाचा लाभ दिला जातो. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प, अत्यल्प भूधारक आणि महिला शेतकऱ्यांना कृषी उपकरणांच्या किमतीवर ५० टक्के अनुदान दिले जाते. योजनेअंतर्गत इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांना ४० टक्के अनुदान दिले जाते. याशिवाय काही राज्य सरकारे विविध योजनांतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना कृषी उपकरणांवर ४० ते ८० टक्के अनुदान देतात. शासनाकडून वेळोवेळी कृषी उपकरणांच्या अनुदानासाठी अर्ज मागविण्यात येतात. यामध्ये अर्ज करून शेतकरी शासकीय अनुदानाचा लाभ घेऊ शकतात. लॉटरीद्वारे कृषी उपकरणांवरील अनुदानासाठी शेतकऱ्यांची निवड केली जाते.

कल्टीव्हेटरची किंमत : कल्टीव्हेटरची किंमत त्यामध्ये स्थापित केलेल्या टायन्सची संख्या आणि त्याची वैशिष्ट्ये यावर अवलंबून असते. जर आपण त्याच्या किंमतीबद्दल बोललो तर त्याची किंमत १२९९९ रुपयांपासून सुरू होते आणि १.६५ लाख पर्यंत जाते.




## कोल्हापूर विभागात ३० साखर कारखाने सुरू; साडेपाच लाख टन गाळप



कोल्हापूर : कोल्हापूर विभागात ३० साखर कारखान्यांनी हंगाम सुरू केला आहे. यामध्ये एकूण ऊस गाळप साडेपाच लाख टन झाले असून, ५ लाख ६० हजार क्विंटल साखरेचे उत्पादन मिळाले आहे. साखर उतारा ८.७० टक्के राहिला आहे. निवडणुकीमुळे १५ दिवस हंगाम पुढे गेला असला तरी विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर तोडणी वाहतूकदार व शेतकऱ्यांच्यात ऊस तोडणीच्या कामाला गती मिळाली आहे.

कोल्हापूर विभागात ४० साखर कारखाने असून, ३० कारखान्यांनी हंगाम सुरू केला आहे. यंदा पाऊस लांबल्यामुळे उसाची वाढ खुंटली. मात्र, पाऊस थांबल्यानंतर थंडीमुळे उताऱ्यात वाढ होणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात साखर कारखान्यांकडे एकूण १ लाख ४० हजार हेक्टर, तर सांगली जिल्ह्यात एक लाख ३७ हजार हेक्टर उसाच्या नोंदी झाल्या आहेत. निवडणुका संपताच कोल्हापूर जिल्ह्यात १५ साखर कारखान्यांनी तर सांगली जिल्ह्यात १५ साखर कारखान्यांनी हंगाम सुरू केला आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात मिळून ८० हजार ऊस तोडणी मजूर बाहेरील जिल्ह्यातून येतात. यापैकी सुमारे ७० हजार मजूर दाखल झाले आहेत. कारखाने हंगाम उशिरा सुरू झाल्याने काही कामगार कर्नाटक व इतर राज्यात गेले आहेत. तर स्थानिकचे ५० हजार कामगार असल्याची माहिती साखर सहसंचालक विभागाकडून देण्यात आली.याचबरोबर यंदा यंत्राद्वारे ऊस तोडणी चांगली होईल, असे चित्र आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात सुरू झालेले कारखाने : सहकारी कारखाने : आजरा शेतकरी, तात्यासाहेब कोरे वारणा, डॉ. डी. वाय. पाटील, जवाहर, छत्रपती राजाराम, शाहू, भोगावती, कुंभी कारखाना. खासगी कारखाने : ओलम ॲग्री, दालमिया भारत पन्हाळा, संताजी घोरपडे शुगर, दौलत इको केन, अथणी शुगर शाहूवाडी, अथणी शुगर भुदरगड. सांगली जिल्ह्यात सुरू झालेले कारखाने सहकारी कारखाने : क्रांती कुंडल, राजारामबापू युनिट ४, हुतात्मा किसन अहिर, सोनहिरा, मोहनराव शिंदे, क्रांती कुंडल, विश्वासराव नाईक. खासगी कारखाने : सद्गुरू, दत्त इंडिया, रायगाव शुगर, यशवंत शुगर, श्रीपती शुगर, उदगिरी शुगर, यशवंत शुगर, दालमिया निनाई शुगर.

## द्राक्ष घड जिरण्याच्या विकृतीवरील उपाय

जिरण्याची समस्या उद्भवत नाही. फळछाटणी घेण्यापूर्वी द्राक्ष काडीची तपासणी करावी. त्यामुळे कोणत्या डोळ्यावर घड आहे किंवा नाही याचे निदान होते. काडी तपासणी अहवालानंतर घड व घडांची संख्या लक्षात घेऊन छाटणी करावी. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि रोग-किडींचे योग्य व्यवस्थापन करावे. वेलीतील अन्नसाठा संतुलित राहण्यासाठी वेळोवेळी पिंचिंग व टॅपिंग करावी. घड निर्मितीसाठी सायटोकायनीन जास्त लागते. त्यासाठी खरड छाटणीनंतर सायटोकायनीन या संजीवकांचा जास्त वापर करावा. त्यासाठी युरॅसिल या रसायनाचा किमान दोन वेळा वापर करावा. घड निर्मितीच्या वेळी ढगाळ वातावरण असेल तरी या संजीवकांच्या वापरामुळे घड जिरण्याची समस्या कमी करणे शक्य होते. ऑक्टोबर छाटणीपूर्वी बोद हलकेसे हलवून मोकळे करावे. त्यामुळे पांढऱ्या मुळीच्या वाढीस पोषक वातावरण तयार होते.

घड जिरण्याची समस्या प्रत्येक वेळी उद्भवत असेल, तर तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन योग्य ते नियोजन करावे. तीन पाने अवस्था : ऑक्टोबर छाटणी झाल्यानंतर साधारणपने डोळे फुटल्यानंतर ३ ते ५ पाने ही अवस्था येते. या अवस्थेमध्ये घड निघण्यास सुरुवात होते. ही अवस्था खूप संवेदनशील असते. त्यामुळे या अवस्थेपासूनच घड जिरण्याच्या समस्येस सुरुवात होते. यापूर्वी या अवस्थेमध्ये द्राक्ष बागायतदार ६ व यांचा वापर करत होते. परंतु सध्या च्या वापरावर निर्बंध आहे. त्यामुळे चा वापर करणे टाळावे. सोबतच ६ किंवा यांचा वापर बंद ठेवावा. कारण यांचा वापर केल्यामुळे शाकीय वाढ जास्त होते, तसेच मजबूत घडनिर्मिती होत नाही. साधारण पाच पाने आल्यानंतर ३ वापराचे वेळापत्रक तयार होते. त्यानुसार पुढील वाटचाल ठेवावी. द्राक्ष बागेमध्ये जीएचा वापर पाकळ्यांच्या वाढीसाठी तसेच मण्यांचा आकार वाढविण्यासाठी केला जातो.



# सोयाबीनमधील ओलावा घालविण्यासाठी हे करा

सोयाबीनची लागवड करणारे शेतकरी सध्या सोयाबीनमधील ओलाव्याच्या समस्येने चिंतेत आहेत. ओलाव्याचे प्रमाण जास्त असल्याने शेतकऱ्यांना सोयाबीनला बाजारात योग्य भाव मिळत नाही. परिस्थिती अशी आहे की, शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी व्यापाऱ्यांना विकावे लागत आहे. मात्र, शासनाने सोयाबीनची शासकीय खरेदी सुरू केली आहे. याशिवाय १५ टक्के ओलावा असलेले सोयाबीन शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याचे आश्वासन दिलेले आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. तरीही साठवणुकीतील सोयाबीनमधील ओलाव्याची समस्या शेतकऱ्यांना सतावत आहे. जास्त ओलाव्यामुळे त्यांचे सोयाबीन खराब होण्याची भीती त्यांना आहे. सोयाबीनमधील ओलाव्याच्या समस्येवर मात करण्यासाठी जाणून घेऊ या पद्धती आणि उपायांबद्दल.

सोयाबीनमधील ओलाव्याच्या समस्येवर मात करण्यासाठी उपाय : फॅन वापरून सोयाबीन सुकवा – तुम्ही तुमचे सोयाबीनचे उत्पादन पेडेस्टल फॅन्सने सुकवू शकता. यामध्ये दर एक किंवा दोन दिवसांनी सोयाबीनमधील आर्द्रता तपासावी आणि त्यानुसार पंख्याचा वेग वाढवा किंवा कमी करावा. ज्या जागेत किंवा कंटेनरमध्ये सोयाबीन वाळवले जात आहे त्याचा वास सतत तपासावा. कुजल्यासारखा वास येत असेल तर जागा किंवा कंटेनर बदलावा, कारण ओलावा कमी न केल्यास सोयाबीन लवकर खराब होऊ शकते.

सोयाबीन सुकविण्यासाठी ड्रायर वापर – बाजारात अनेक प्रकारचे ड्रायर मशीन उपलब्ध आहेत ज्याचा वापर करून तुम्ही तुमचे सोयाबीन सुकवू शकता. तापमान वाढवणे किंवा कमी करण्याचा पर्याय देखील आहे. त्यानुसार आपण इच्छित तापमान सेट करू शकता. यामध्ये लक्षात ठेवा की, सोयाबीन उच्च तापमानात सुकवल्याने त्याचे दाणे फुटण्याची शक्यता असते, त्यामुळे ते बाजारात विकणे कठीण होते. अशा परिस्थितीत सोयाबीन ड्रायरने सुकवण्याबाबत, या यंत्रासोबत दिलेल्या पुस्तिकेत दिलेल्या वापराच्या सूचनांचे पालन करावे.

सोयाबीन कमी तापमानात ग्रेन स्प्रेडरने वाळविणे – सोयाबीन पीक सुकविण्यासाठी ग्रेन स्प्रेडरचा वापर केला जाऊ शकतो. त्यावर तुम्ही सोयाबीन पसरवू शकता. या तंत्रात सोयाबीनचे उत्पादन कमी तापमानात वाळवता येते. या स्प्रेडरचा मजला सच्छिद्र असून त्याखाली पंखा लावता येतो. या पंख्याच्या गतीवर सोयाबीन सुकण्याचा वेग अवलंबून असेल. सोयाबीनच्या सुकण्याच्या गतीमध्ये बाहेरील तापमानही महत्त्वाची भूमिका बजावते. जर बाजार गरम असेल तर तुमचे सोयाबीन पीक लवकर सुकते. बाजारात दमट वातावरण असेल तर सुकायला जास्त वेळ लागू शकतो. सोयाबीन ओलसर ठिकाणी ठेवणे टाळा – सोयाबीन ओलसर ठिकाणी ठेवणे टाळावे. ओलसर जागी सोयाबीन साठविल्यास ओलावा आणि ओलसरपणा येतो आणि जास्त ओलाव्यामुळे सोयाबीनला बुरशी येऊ शकते आणि सोयाबीनचे पीक खराब होऊ शकते. अशा स्थितीत सोयाबीन ठेवण्यासाठी हवा व योग्य प्रकाश असलेली जागा निवडावी. कच्च्या सोयाबीनच्या उत्पादनामध्ये संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो, ज्यामुळे संपूर्ण उत्पादन खराब होऊ शकते.

सोयाबीन सुकविण्यासाठी आगीचा वापर करू नका – सोयाबीनचे उत्पादन सुकविण्यासाठी आग किंवा उष्णतेचा कधीही वापर करू नये. यामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान होऊ शकते. सोयाबीन जळण्याचा धोका असतो. त्याचबरोबर सोयाबीनचे दाणे जास्त उष्णतेमुळे फुटू शकतात. अशा स्थितीत सोयाबीन सुकविण्यासाठी कधीही आगीचा वापर करू नये, त्यामुळे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे, त्यामुळे धान्य खराब होऊन उत्पादन खरेदी करता येत नाही.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६३ : अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी नोव्हेंबर २६ हा थँक्सगिव्हिंग डे म्हणून घोषित केला.
१९४१ : लेबेनॉन हा देश स्वतंत्र झाला.
१९४९ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सादर केलेल्या संविधानास मान्यता मिळाली.
१९६० : भारतात सर्वप्रथम कानपूर आणि लखनो या दोन शहरांत आजच्या दिवशी मध्ये एसटीडी सेवा सुरु झाली होती.
१९६५ : ॲस्टॅरिक्स (-१) हा फ्रान्सचा पहिला उपग्रह अल्जीरीयातून अंतराळात प्रक्षेपित करण्यात आला.
१९६७ : मध्ये लिस्बन शहरात ढगफुटी झाल्यामुळे ४५० लोकांना जीव गमवावा लागला होता.
१९८४ : इराक आणि अमेरिका ने मध्ये राजनीतिक संबंध पुनर्स्थापित केले होते.
१९९० : मध्ये ब्रिटनची माजी प्रधानमंत्री मार्गारेट थॅचर यांनी त्यांचा राजीनामा ब्रिटन च्या राणीला सोपवला होता.
१९९२ : मध्ये ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांना त्यांच्या संपत्ती वर कर द्यावा लागेल हा नवीन निर्णय त्यांच्या संसद मध्ये घेण्यात आला होता.
१९९७ : अवकाश आणि संरक्षण क्षेत्रात भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळवून देणारे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि पंतप्रधानांचे विज्ञानविषयक सल्लागार डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९९८ : खाणा रेल्वे अपघातात २१२ जणांचा मृत्यू झाला.
१९९९ : विकीरण जीवशास्त्र या विषयात महत्त्वपूर्ण संशोधन केल्याबद्दल इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च तर्फे जैववैद्यकीय संशोधनासाठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी डॉ. रावसाहेब काळे यांची निवड करण्यात आली.
२००६ : ला इराक़ मध्ये झालेल्या बॉम्ब स्फोटामध्ये २०२ लोक मृत्युमुखी पडले होते.
२००८ : मुंबई मध्ये ला दहशदवाद्यांनी आत्मघाती हल्ला केला होता, त्यांनी मुंबई च्या ताज हॉटेल मध्ये घुसून अनेक लोकांना बंधक बनवले होते, पण त्यावर देशाच्या जवानांनी आणि पोलिसांनी चोख प्रतिउत्तर देत तीन दिवसात बंधकांना मोकळे केले होते.
२००८ : मध्ये मुंबईला झालेल्या दहशदवादी हल्यात १६४ लोक मारले गेले होते आणि २५० पेक्षा जास्त लोक गंभीर जखमी झाले होते.
२००८ : महाराष्ट्र राज्यात संविधान दिन म्हणून पहिल्यांदा साजरा केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८५ : देवेन्द्र मोहन बोस – वैश्विक किरणांवर मूलभूत संशोधनाची सुरूवात करणारे भारतीय पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २ जून १९७५)
१८९० : सुनीतिकुमार चटर्जी – आधुनिक ऐतिहासिक भाषाशास्त्र व ध्वनीविचार यांच्या अभ्यासाची मुहूर्तमेढ रोवणारे भाषाशास्त्रज्ञ, साहित्य व संस्कृतीचे अध्यापक (मृत्यू: २९ मे १९७७)
१९०४ : भारतीय कवि, विद्वान, लेखक, तत्वज्ञानी के. डी. सेठना यांचा जन्म. (मृत्यू: २९ जून २०११)
१९१९ : भारताचे प्रसिद्ध इतिहासकार शिक्षविद राम शरण शर्मा यांचा मध्ये जन्म.
१९२२ : अमेरिकेतील प्रसिद्ध व्यंगचित्रकार चार्ल्स एम. शुल्झ यांचा मध्ये जन्म.
१९२३ : भारतीय सिनेमॅटोग्राफर व्ही. के. मूर्ति यांचा जन्म. (मृत्यू: ७ एप्रिल २०१४)
१९२३ : राजाराम दत्तात्रय तथा राजा ठाकूर चित्रपट दिग्दर्शक (बोलविता धनी, मी तुळस तुझ्या अंगणी, माझं घर माझी माणसं, घरचं झालं थोडं, गजगौरी, जख्मी) (मृत्यू: २८ जुलै १९७५ मुंबई)
१९२४ : भारतीय क्रिकेटपटू जसुभाई पटेल यांचा जन्म.
१९२६ : कादंबरीकार, कामगार चळवळीचे नेते प्रभाकर नारायण पाध्ये उर्फ भाऊ पाध्ये यांचा जन्म.
१९२६: महान शास्त्रज्ञ आणि शिक्षक यशपाल यांचा मध्ये जन्म.
१९२६: भारतीय राजकारणी रवी रे यांचा जन्म.
१९५४: वेलुपल्ली प्रभाकरन – एल. टी. टी. ई. चा संस्थापक (मृत्यू: १८ मे २००९)
१९६१ : कोबरा बीयरचे सहसंस्थापक करण बिलिमोरिया यांचा जन्म.
१९७२ : अर्जुन रामपाल – अभिनेता
१९८१ : प्रसिध्द लेखक, प्रकाशक, कवी, संपादक आणि भाषाशास्त्रज्ञ नाथुराम प्रेमी यांचा जन्म मध्ये जन्म.
१९८३ : फेसबुकचे सहसंस्थापक क्रिस ह्यूजेस यांचा जन्म.
१९९१ : भारतीय इतिहासकार आणि शैक्षणिक राम शरण शर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑगस्ट २०११).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३७ : भारताचे राजनीतीतज्ञ तसेच हिंदी साहित्यामध्ये आपली छवी निर्माण केलेले शंकर दयाल सिंग यांचे मध्ये आजच्याच दिवशी निधन झाले होते.
१९८२ : च्या आयपीएस बॅच चे अधिकारी २००८ मध्येमुंबईयेथे झालेल्या दहशदवादी हल्ल्यात शहीद झाले होते.
१९८५ : 'राजकवी' यशवंत दिनकर पेंढारकर तथा कवी यशवंत रविकिरण मंडळातील एक कवी, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर त्यांना 'महाराष्ट्र कवी' म्हणून गौरविण्यात आले. (जन्म: ९ मार्च १८९९)
१९९४ : भालजी पेंढारकर – मराठी चित्रपटसृष्टी आणि समाजमनावर पाच तपे अधिराज्य गाजवणारे चित्रमहर्षी (जन्म: २ मे १८९९)
१९९९ : दत्तात्रय शंकर जमदग्नी – पुण्यातील जनता सहकारी बँकेचे संस्थापक संचालक.
२००१ : चंद्रकांत कृष्णाजी जगताप – शिल्पकार, पुणे रेल्वे स्थानकासमोरील महात्मा गांधींचा पुतळा, शनिवारवाड्यासमोरील सिंहाची प्रतिमा, सिंहगडावरील तानाजी मालुसरेंचा पुतळा ही त्यांनी घडवलेली काही प्रसिद्ध शिल्पे आहेते. याशिवाय त्यांनी तयार केलेली देवदेवतांची अनेक शिल्पे महाराष्ट्रात आहेत.
२००४ : मध्ये याच दिवशी भारताचे इतिहासकार तपन राय चौधरी यांचे निधन झाले होते.
२००८ : हेमंत करकरे, अशोक कामठे, विजय सालसकर, तुकाराम ओंबाळे – मुंबई पोलिस दलातील अधिकारी.
२०१२ : भारतीय लेखक आणि अनुवादक एम सी सी नंबुदीपदी यांचे निधन. (जन्म: २ फेब्रुवारी १९१९)

# अनाधिकृत हार्डिंग्जमुळे शहराचे विद्रुपीकरण

## वाहतुकीस अडथळा, अपघाताला निमंत्रण ❯ सीओ नीता अंधारे यांचे अभय ❯ नगरपरिषद प्रशासन संचनालयात तक्रार

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अनाधिकृत होर्डिंग्ज मुळे शहराचे विद्रुपीकरण होत असुन विना परवाना बॅनर लावणाऱ्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद असतानाही राजकीय पुढाऱ्यांच्या निवडी,शहरात स्वागत, लोकप्रतिनिधी निवडून आल्याने शुभेच्छा देणाऱ्या अनाधिकृत होर्डिंग्जची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सुंदर दिसणारा छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पर्यायाने शहराचे विद्रुपीकरण होत आहे.संबधित प्रकरणात लेखी तक्रार देऊनही सीईओ नगरपरिषद नीता अंधारे जाणिवपूर्वक कारवाई करणे तर दुरच परंतु अनाधिकृत होर्डिंग्जला अधिकृत करण्याचा घाट नगरपरिषद करत असुन त्यांना बीडकरांच्या जीवाशी काही सोयरसुतक नसल्याचे दिसून येत असुन संबंधित प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांना लेखी तक्रार केली आहे.

मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग्ज कोसळुन झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला होता.त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी १७ मे २०२४ रोजी बीड नगरपरीषदेला त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये याबाबतच्या तातडीच्या उपाययोजना करण्यात येऊन विना परवाना होर्डिंग्ज, बॅनर,फलक लावण्यासाठी उभा करण्यात



आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर, बॅनर,फलक २४ तासांच्या आत काढुन घेण्यात यावा नसता मुदतीनंतर होर्डिंग्ज धारकां विरोधात रितसर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत व होर्डिंग्ज लावण्यासाठी आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर, फलक काढुन घेऊन त्यासाठी लागणारा खर्च रितसर वसुल करण्यात यावा असे आदेश दिले होते.त्याअनुषंगाने बीड शहरातील ७१ अनाधिकृत होर्डिंग्ज हटवण्यासाठी नगर पालिकेने संबंधित ५ लोकांना पत्र दिले होते.यात २४ तासांची मुदत देत फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा ईशाराही दिला होता मात्र सीईओ नीता अंधारे यांनी कारवाई करण्याऐवजी अनाधिकृत होर्डिंग्जला अधिकृत करण्याचा घाट घालत त्यांची पाठराखण केल्याचे दिसून आले.

### अनाधिकृत होर्डिंग्ज अधिकृत करण्याचा नगरपालिकेचा घाट

बीड नगरपरीषदेने बीड शहरातील अवैध ९० होर्डिंग्ज धारकांवर कसलीही कारवाई केली नाही उलट अवैध होर्डिंग्ज स्ट्रक्चरल ऑडिटने वैध करण्याचा घाट नगरपालिकेने घातला असुन खासगी अभियंत्यांमार्फत व्यावसायिकांनी होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा घाट घातला असून नगरपालिकेने या पडताळणी केली नाही याउलट नगरपालिकेचे परवानगी न घेता चौका चौकात मोठं होर्डिंग बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामुळे कर तर बुडतच आहे परंतु वाहतूकीस अडथळा निर्माण होत असुन अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाई न करताच स्ट्रक्चर ऑडिटच्या नावाखाली होर्डिंगला वय ठरवून अनेक वर्षापासून नगरपालिकेचा कर चुकावणाऱ्या होर्डिंग धारकांची पाठ राखण करत उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमान ना करणाऱ्या मुख्याधिकारी नगर परिषद बीड येथे अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केल्यानंतर सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त(गट -अ) नगरपरिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी सह आयुक्त/उपायुक्त नगरपरिषद प्रशासन शाखा विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची आपल्या स्तरावरून शहानिशा करून उचित कार्यवाही करावी व अर्जदारास लक्ष्यवेधी आंदोलनापासून परावृत्त करावे.तसेच केलेल्या कार्यवाहीची एक प्रत संचालनालयास तात्काळ सादर करावी असे नमुद केले होते.मात्र या घटनेला ६ महिने उलटूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे. मुंबई येथील घाटकोपरच्या घटनेनंतर नगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणात घर, इमारत आदी खाजगी ठिकाणी धोकादायक असे ७० होर्डिंग्ज आढळले होते.तसेच सार्वजनिक ठिकाणी १९ होर्डिंग्ज होते या ९० पैकी एकाही होर्डिंग्जला नगरपालिकेची परवानगी नसल्याचे बीड नगर परिषदेचे कर निरीक्षक विश्वांभर तिडके यांनी माहिती दिली.

## थोडक्यात



### औरंगपूर येथे संविधान दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा औरंगपूर ता.शिरूर कासार येथे दि.२६/११/२०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी संविधान पत्रिकेचे वाचन केले.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. द. ल.वारे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील शिक्षिका श्रीम.दैवाशाला भोंडवे ह्यांनी केले.कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी तसेच ट्रेनी शिक्षिका श्रीम.मीरा कापसे ह्या उपस्थित होत्या.

### विनायक प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

विनायक प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. किर्तीताई पांगारकर यांच्या हस्ते घटनेचे शिल्पकार,संविधानाचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शाळेचे बाळू काळे सरांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून भारतीय संविधानाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शाळेतील अशोक काशीद सरांनी भारतीय संविधानाचे विविध पैलू,संकल्पना याविषयीची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना करून दिली.भारती क्षीरसागर मॅडम, प्रतिभा वाघमारे मॅडम,शैलजा बावस्कर मॅडम,तन्वीर पठाण सर, सुनीता चौधरी मॅडम,संजीवनी पवळ मॅडम,उत्तरेश्वर भारती सर, अनिल लेहणे सर यांनी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.डॉ बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाच्या मसुदा समितीचे प्रमुख होते.त्यांच्या अथक परिश्रमाने व अभ्यासाने आपल्याला २६ नोव्हेंबर १९४९ ला राज्यघटना मिळाली म्हणजेच संविधान मिळाले व प्रत्यक्षात ते अंमलात आणले.देशात राष्ट्रीय एकात्मता राहावी,आपले हक्क आपले सरकार ,आपली अभिव्यक्ती चे जतन आपल्याला संविधानाच्या निमित्ताने मिळतात म्हणून संविधान हे आपल्यासाठी, आपल्या देशात एकता,अखंडता राहण्यासाठी महत्वाचे आहे असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापिका सौ.किर्तीताई पांगारकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधीत केले.संविधान दिनाच्या निमित्ताने शाळेतील मुला मुलींनी भारताचे संविधानाची उद्देशिका वाचण्यात आली व तिचे तंतोतंत पालन करण्याची प्रतिज्ञा केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक गव्हाणे सरांनी केले तर आभार प्रतिभा मॅडमनी केले.



क्रमांक.२०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी कावि-२५७
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारुर
दिनांक. ०९/१०/२०२४

जाहिरनामा

जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस मौजे, धारुर ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्रीम. सत्वधर सुनिता दत्तोबा रा. धारुर ता. धारुर जि. बीड यांचा जन्म दिनांक ०५/०६/१९७४ रोजी मौजे, धारूर ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहु जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर न्वहे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसाच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. ०९/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला

आदेशावरुन
स्वाक्षरित
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार धारुर

## माजलगाव धरणाचे पाणी शेतीसाठी सोडा-भाई अॅड. गोले

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव धरण पूर्ण क्षमतेने भरले असून माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची अनेक पिके पाण्या अभावी करपत असून, गुरांना पिण्यासाठी पाणी नाही,अनेक शेतकऱ्यांना ऊस लागवड करण्यासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता असून प्रशासन निवडणुकीत गुंतल्याने शेतीसाठी पाणी सोडण्यास विलंब झाला असून अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाची काढणी केल्यानंतर पाण्याची वाट पाहत जमिनी खाली ठेवलेल्या असून चातक पक्षाप्रमाणे शेतकरी माजलगाव धरणाचे पाणी पाटाला सोडण्याची वाट पाहत असताना देखील प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने माजलगावात शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील यांच्या



नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आक्रमक होत, माजलगाव धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्याची मागणी तहसीलदार माजलगाव यांना दि.२६ नोव्हेंबर मंगळवार रोजी निवेदनाद्वारे केली असून शेतीसाठी पाणी न सोडल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशारा शेकाप नेते भाई अॅड. नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, भाई राजाभाऊ शेरकर, हनुमान डाके,भागवत कोळसे आदिंनी दिला आहे.

## बंकटस्वामी महाविद्यालयात संविधान दिन साजरा

बीड। प्रतिनिधी

दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विवेक मिरगणे व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा ब्रम्हनाथ मेंगडे यांनी संविधान ग्रंथाचे पूजन करून अभिवादन केले. त्यानंतर उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. प्रत्येकाने संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्य याचे पालन केले पाहिजे तसेच लोकशाही मजबूत राहण्यासाठी संविधानाचा जागर व अभ्यास सर्व विद्यार्थी




नागरिकांनी केला पाहिजे आणि आपल्या गावामध्ये परिसरामध्ये संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्य याविषयी जागरूकता निर्माण करण्याचे कर्तव्य हे महाविद्यालयीन शिक्षक प्राध्यापक विद्यार्थी यांचे आहे आणि त्यानुसार आपण कार्य केले पाहिजे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विवेक मिरगणे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.मनोजकुमार नवसे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील शिक्षक प्राध्या.पक व शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

## केएसके महाविद्यालयात संविधान दिन साजरा

बीड। प्रतिनिधी

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बीड मध्ये संविधान दिन घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले व त्यानंतर भारतीय राज्यघटनेतील उद्देशिकेचे सार्वजनिक वाचन करण्यात आले.यावेळी प्राध्यापक डॉ. कदम यांनी उद्देश पत्रिकेचे वाचन केले. तसेच मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या जवानांना अभिवादन ही करण्यात आले.



भारतीय राज्य घटना २६ नोंव्हेंबर १९४९ रोजी संसदीय विधीमंडळात स्विकारल्या गेली म्हणूनच आज संविधान दिन साजरा करण्यात येतो.आजच्या या दिनी ज्यांनी संविधान लिहिले त्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधाना बद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आजचा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.कारण संविधानाने आपल्याला अनेक हक्क दिले आहेत त्यामुळे आपण संपूर्ण स्वातंत्र्य आणि समानतेने जीवन जगतो.तसेच देशातील नागरिकांमध्ये घटनात्मक मुल्यांबद्दल आदराची भावना वाढवणे हा संविधान दिनाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बळीराम राख तर आभार डॉ.पल्लवी इरलापल्ले यांनी मानले.यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,कमवि उपप्राचार्य नारायण काकडे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.ए.एस.खान डॉ.सुधाकर गुट्टे,कार्यालयीन अधिक्षक डॉ.देशमाने व्ही.टी., तर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

## मिल्लीया महाविद्यालयात संविधान दिन साजरा



बीड। प्रतिनिधी

येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख वक्त्या म्हणून प्राध्यापिका डॉ. शामल जाधव, अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील तसेच उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ, उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एसएस, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग, डॉ. शेख रफिक, प्राध्यापिका डॉ. शेख एजाज परवीन, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. खय्युम फारुकी, डॉ. शेख गफूर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग यांनी केले. त्यांनी सांगितले की भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत असून, प्रत्येक भारतीय नागरिकात संविधान घटना, प्रास्ताविका यातील उच्च तत्वे, मूल्ये याबद्दल माहिती व्हावी.प्रमुख वक्त्या डॉ. शामल जाधव यांनी भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ असून, त्यातून भारतीय जीवनशैली, स्वतंत्र, समता, बंधुता व सर्वधर्म समभावाची शिकवण मिळते तसेच संविधानाने आपल्याला अनेक हक्क दिले आहेत, त्यामुळे आपण संपूर्ण स्वातंत्र्य आणि समानतेने जीवन जगतो. भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता वाढवणे, घटनात्मक अधिकार व कर्तव्या बद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवने आवश्यक आहे असे सांगितले.

तसेच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांनी संविधानातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, भारतीय संविधानातील मूल्य, त्यांचे अर्थ, प्रत्येक भारतीयाची मूलभूत कर्तव्य याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. शेख गफूर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात संविधान दिन साजरा

नेकनूर। प्रतिनिधी

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर या महाविद्यालयातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्या वतीने दि. २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.वंजारे तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय नेकनूर हे उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून प्रा. विजय मस्के हे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विक्रम इनकर यांनी केले तर सूत्रसंचालन लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. राम देशमुख यांनी केले. प्रा. वंजारे यांनी आपले मत मांडत असताना भारतीय राज्यघटनेचे महत्त्व समजून सांगितले




भारतीय नागरिकांना जसे अधिकार दिलेत तसेच कर्तव्यही दिले आहेत. त्याचे विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे व समाजामध्ये वावरत असताना भारतीय राज्यघटनेच्या नियमानुसार आपण त्याचा वापर करावा विद्यार्थ्यांनी भारतीय राज्यघटनेचा अभ्यास केला पाहिजे असे आपले मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. विजय मस्के यांनी समाजामध्ये संविधानाची जनजागृती करणे गरजेचे आहे. असे म्हणाले तसेच भारतीय राज्यघटना बाबासाहेबांनी समाजामध्ये सर्व घटकांना समान अधिकार देण्यासाठी लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी लिहिली आहे.भारतीय राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे. ही विद्यार्थ्यांना राज्यघटने विषयी माहिती सांगितली कार्यक्रमाचे अभार प्रा.रामरुले यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधान हे देशाचे हृदय -आबासाहेब हांगे

पाटोदा। प्रतिनिधी

भारतीय संविधान हे लोकशाही शासनप्रणाली प्रचलित असलेल्या आपल्या भारत देशाचे हृदयच आहे. भारतीय राज्यघटना ही लवचिक व ताठर अशा दोन्हीही स्वरूपाची असून राज्यघटनेमुळेच भारतीय लोकशाही अबाधित आहे असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भाव ध्वजदिन (दि. २५) व संविधान दिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात ते



अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउल्गे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. काकासाहेब पोकळे उपस्थित होते.

कार्यक्रमात सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण संपन्न झाले. महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जालिंदर लोणके यांनी केले. याप्रसंगी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन प्रा. अजिंक्य साखरे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.संविधान दिनानिमित्त प्रमुख मार्गदर्शनपर भाषणात डॉ. काकासाहेब पोकळे यांनी भारतीय राज्यघटना निर्मिती प्रक्रिया, राज्यघटनेची वैशिष्ट्ये, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये यावर सविस्तर भाष्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. संजय बोंडगे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# वेळ कमी मिळाला, आता नव्या-जुन्यांची सांगड घालून पुढच्या निवडणुकीवर लक्ष

## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेमधून केली स्पष्ट भूमिका

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवारी उशिरा घोषित होणे, माजी मंत्री जेष्ठ नेते जयदत्त क्षीरसागर यांचा शेवटच्या टप्प्यात मिळालेला पाठिंबा, एकूणच पाहता कमी वेळेमध्ये देखील सर्वच महायुती व इतर घटकातून निवडणुकीचे कामे झाली. मात्र मताचे ध्रुवीकरण झाल्याने २०१९ प्रमाणे २०२४ मध्ये देखील निसटता पराभव स्वीकारावा लागला. आता नव्या आणि जुन्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांची सांगड घालून पुढील निवडणुकीचे लक्ष असेल अशी भूमिका डॉ योगेश क्षीरसागर यांनी स्पष्ट केली.



विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुती अजित पवार गटाचे उमेदवार योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेतली यावेळी ते आणि त्यांच्या पत्नी डॉ सारिका क्षीरसागर उपस्थित होत्या. योगेश क्षीरसागर म्हणाले, २०१९ मध्ये झालेल्य विधानसभा निवडणुकीत ज्येष्ठ नेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा निसटता पराभव झाला होता. मागील पाच वर्षांमध्ये बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये कोणत्या प्रकारची विकास कामे झाली आणि नाहीत हे सर्व मतदारांना माहित आहे. चुकीची दुरुस्ती करण्याची ही यंदाची निवडणूक होती मात्र मला जाहीर झालेली उशिराची उमेदवारी त्याचबरोबर ज्येष्ठ नेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा शेवटच्या टप्प्यात मिळालेला पाठिंबा, एकूणच पाहता कमी कालावधीमध्ये विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जावे लागले. महायुतीसह सर्वच नेते, जेष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी निवडणुकीमध्ये मिळेल ती कामे आणि जबाबदारी पूर्ण करत प्रयत्न केले ते महत्त्वाचे होते मात्र मतदानाच्या आठ दिवसांमध्ये झालेले मताचे ध्रुवीकरण यामुळे या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. हा आपला पराभव नसून बीड विधानसभा मतदारसंघात विकास कामाला लागलेला स्पीड बेकर आहे, हे यावरून स्पष्ट झाले आहेत. कारण केंद्रात आणि राज्यांमध्ये महायुतीचे सरकार आहे आणि पुढील उमेदवार हे महाविकास आघाडीचे आहेत येणाऱ्या काळात आपण शांत बसणार नाहीत मतदारसंघांमध्ये जे काही विकास कामे खेचून आणता येतील ती आणून येथील विकास कामे पूर्ण करण्यासाठी शक्तीचे प्रयत्न करणार असल्याचेही डॉ. क्षीरसागर यांनी सांगितले.

### पुढील पाच वर्षात काय होईल हा प्रश्न

मागील पाच वर्षात विद्यमान आमदारांकडून काय झाले व पुढील पाच वर्षात काय विकास करून दाखवतील हा मोठा प्रश्न आहे. त्याचबरोबर किती प्रमाणात मतदारसघात निधी उपलब्ध होईल हे देखील प्रश्न समोर असल्याचे डॉ. क्षीरसागर यांनी सांगितले.

### विकास कामाला विरोध नसेल

बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये विद्यमान आमदार यांच्याकडून विकास कामे व्हावीत आणि त्यांनी करावी त्यासाठी शुभेच्छा असतील. त्यांनी विकास कामे करावेत त्याला आमचा विरोध नाही मागील अनुभव पाहता मतदार देखील संभ्रमावस्थेत आहेत असे त्यांनी सांगितले.

### ही निवडणूक जाती धर्मावर गेली

बीड विधानसभा निवडणूक ही जाती धर्मावर गेली त्यामुळेच असे निकाल पाहावयास आले आहेत. मात्र आम्ही येणाऱ्या कालावधीमध्ये एका एका माणसाला भेटून माणुसकी आणि विकास कामाचा दाखला दाखवत त्यांचे परिवर्तन करू. नवीन आणि जुन्या सर्वच कार्यकर्ते पदाधिकारी यांची योग्य सांगड, ज्येष्ठांचे मार्गदर्शन व नियोजनातूनच सिद्ध करून दाखवू असाही दावा डॉ सारिका क्षीरसागर यांनी माध्यमांशी बोलताना केला.

# युवा पिढीने संविधानाचा सखोल अभ्यास करावा : आ.सुरेश धस

आष्टी: प्रतिनिधी

सध्याची युवा पिढी ही सोशल मीडियावर जास्त ॲक्टिव्ह असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.मोबाईल मुळे वाचन क्षमता हरपत चाललेली आहे. घराघरांमध्ये मोबाईलने थैमान घातल्यामुळे वाचनाकडे आई-वडिलांसह मुलाचेही दुर्लक्ष होत चालले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल्या संविधानात आहे हे वाचण्यासाठी आजची तरुणाई वेळ देत नाही. त्यासाठी तरुणांनी संविधानाचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. ते आष्टी येथे नगरपंचायत कार्यालयात संविधान दिन कार्यक्रमात बोलत होते यावेळी व्यासपीठावर मुख्याधिकारी सौ. पाटील मॅडम, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे ,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.



पुढे बोलताना धस म्हणाले की,भारताचे संविधान जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ मानले जाते. येथील बंधूता, समता आणि स्वातंत्र्य जगाच्या पाठीवर कुठेही पहायला मिळत नाही भारतीय संविधानाने येथील नागरिकांना खरे स्वातंत्र्य बहाल करून दैनंदिन जीवन जगण्याचा अधिकार दिला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर डॉ राजेंद्र प्रसाद आणि सर्व सदस्यांनी दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी घेऊन सक्षम राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार करून २६ जानेवारी १९४९ ला देशात ती अमलात आली. जगाच्या पाठीवर सक्षम लोकशाहीचा आपण स्विकार केला. दैनंदिन जीवनात कसे जगायचे हे अधिकार आपल्याला राज्यघटनेने दिलेले आहेत अनेक महापुरुषांनी अभ्यास करून तळागाळापर्यंत जाऊन सक्षम राज्यघटना निर्माण केली आहे. तळागाळातील लोकांना जगण्याचा अधिकार हा संविधानाने दिला असून यामुळे अनेक गोरगरीब व दिन दुबळ्या जनतेचा मोठा फायदा झाल्याचे धस यांनी सांगितले. यावेळी आष्टी शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. उपनगराध्यक्ष व्यापारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय शेठ मेहेर अरुण भैय्या सरपंच अशोक मुळे, डॉ जालिदर वांढरे,सचिन लोखंडे, निकाळजे,सादीक कुरेशी,बाळुशेठ मेहेर दीपक निकाळजे, राजेंद्र जोशी, राहुल मुथा,नवनीत कासवा, बंबुशेठ आतार शममुभाई दारुवाले,समिर शेख,शरीफ शेख, मधुकर नवसुपे,पत्रकार उत्तम बोडखे,दत्ता काकडे,रघुनाथ कर्डीले, दुर्गेश कुलकर्णी, जोतिबा रेडेकर,अविशांत कुमकर,शरद रेडेकर,प्रविण पोकळे,शरद तळेकर,सचिन रानडे,गणेश दळवी, संतोष सानप,आधीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्देशिका हा संविधानाचा आत्मा-महेंद्रकुमार कांबळे


बीड । प्रतिनिधी

भारतीय संविधानामागील पार्श्वभूमी, भारतीय संविधानाची रचना, वैशिष्ट्ये, नागरिकांचे मुलभूत अधिकार आदी बाबींवर मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाची विविध पैलूंवर प्रकाश टाकत भारतीय संविधानाची उद्देशिका हा भारतीय संविधानाचा आत्मा असल्याचे प्रतिपादन निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिनानिमित्त जाणून घ्या आपले संविधान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविकपर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व सांगितले.

मंचावर निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उप जिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, उप विभागीय अधिकारी श्रीमती कविता साधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाने, नायब तहसीलदार सुधाकर टाक, माधव काळे, श्रीमती नर्मदा उगलमुगले यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.



पाटोदा - शहरातील संत बाळुदेव महाराज विद्यालय आणि महिला महाविद्यालय येथे संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले . यानिमित्ताने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस वंदन केले याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र आविळे,प्रा.कोल्हे मडम,शिक्षक सुभाष देसाई, देविदास वाघ, अंबादास मोहळकर,असिफ शेख, पत्रकार हमीदखान पठाण,सेवक राम देसाई, बाबाजी चव्हाण, सचिन शिंदे, अमोल जाधववर सह अनेक जन उपस्थित होते

# मनोज जरांगे यांच्याकडून पंडित कुटूंबियांचे सांत्वन



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील दैठण या गावातील उद्योजक सचिन पंडित यांचे वडिल कै.भैय्यासाहेब रामभाऊ पंडित यांचे ◀◀ पान ३ वर

# मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पत्रकार चंद्रकांत साळुंके कुटुंबीयांना आर्थिक मदत

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पत्रकार चंद्रकांत साळुंके यांचे दुचाकी अपघातामध्ये निधन झाले होते. त्यांचे मूळ गाव बीड तालुक्यातील नागापूर हे आहे. मंगळवारी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी पत्रकार साळुंके यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच परिषदेच्या वतीने



आर्थिक मदतीचा त्यांना १५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.

पत्रकार चंद्रकांत उद्धवराव साळुंके ( वय ४४ ) बीड शहरामध्ये मागील अनेक वर्षापासून माध्यम क्षेत्रात कार्यरत होते. ◀◀ पान ३ वर

# राजेभाऊ फड यांच्याकडून सेवायज्ञ सुरुच

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते तसेच कन्हेरवाडीचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने मागील अनेक वर्षांपासून मुलींचं कन्यादान करण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यात येते. सामाजिक दायित्व आणि सामाजिक ऋण परतफेडीच्या भावनेतून त्यांनी शेकडो लेकिंचे



दोन मुलींच्या विवाहासाठी दिले प्रत्येकी ११ हजार

कन्यादान करण्यासाठी ऐच्छिक मदत केली आहे. मुलीचे लग्न असेल तर त्यांच्याकडून न चुकता मदत करण्यात येते. त्याप्रमाणे त्यांनी आज गावातील दोन मुलींच्या लग्नासाठी आर्थिक सहाय्य करत सामाजिक भावना जोपासली आहे. हा सेवायज्ञ त्यांनी अखंडपणे आजही सुरूच ठेवला आहे.

परळी ◀◀ पान ३ वर

# धारूर शहरातील महायुतीच्या नेत्यांनी पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज

## धारूर शहरात प्रकाश सोळंके यांना एकूण १२००९ मता पैकी फक्त १७६० मत मिळाली

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर शहराच्या विकासासाठी विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी मागच्या पाच वर्षाच्या काळात कोठ्यावधी रुपयाचा निधी दिला मात्र शहरात अपेक्षित अशी मत मिळवण्यात यश आले नाही त्यामुळे महायुतीच्या व राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आत्मपरीक्षन करणे गरजेचे.



माजलगाव विधानसभा निवडणूक नुकतीच पार पडली अतिशय चुरशीच्या झालेल्या लढतीमध्ये महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रकाश सोळंके यांना काठावर विजय मिळवण्यात यश आले धारूर शहरातील सर्वांगीण विकास कामांना कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला असताना देखील महायुतीच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी शहरातील मतदारांपर्यंत विकास कामे पोहोचण्यात यश आले नाही त्यामुळे शहरातील एकूण वीस बूथ वर झालेल्या १२००० मतांपैकी केवळ १७६० मत महायुतीच्या उमेदवारास मिळाली, ३५ वर्षाच्या राजकीय अनुभव व मुत्सद्येगिरीच्या बळावरच प्रकाश सोळंके यांनी माजलगाव चा गड राखण्यात यश मिळवले

धारूर शहरातील ◀◀ पान ३ वर

# कार्यकर्ता संवाद बैठकीत माजी आ.आजबेंनी दिला विश्वास

आष्टी प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपला पराभव झाला असला तरी कुणीही खचून जाऊ नये राजकारणात जय आणि पराजय हा चालतच असतो पराभवाने खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने आपल्या कामाची सुरुवात जो करतो तो नक्कीच येणाऱ्या काळात यशस्वी होत असतो तुमच्यासारख्या निस्वार्थी आणि निर्भीड कार्यकर्त्यांची फळी माझ्याबरोबर असल्यामुळे येणाऱ्या काळात आपण पुन्हा नव्या ताकदीनिशी मैदानात उतरून जोमाने कामाला लागू मी तुमच्या नेहमी बरोबरआहे येणारा काळ आपलाच आहे असा विश्वास माजी आ.बाळासाहेब आजबे यांनी कार्यकर्ता संवाद बैठकीत बोलताना व्यक्त केला .



नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या पराभवानंतर ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् असोसिएशन आयोजित संविधान दिन पिंपरी कोर्टात साजरा






पुणे । प्रतिनिधी

नेहरू नगर पिंपरी न्यायालयात पुरुष बार रूममध्ये पिंपरी चिंचवड डव्होकेटस् असोसिएशनच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात ही प्रमुख व्याख्याते व प्रमुख उपस्थिती व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या हस्ते सर्व महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहार घालून तसेच दीप प्रज्वलन करून व तसेच प्रमुख व्याख्याते माजी आमदार जयदेव गायकवाड यांनी संविधानाची प्रस्ताविका वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.संविधान दिनाचे औचित्य साधून प्रमुख वक्ते म्हणून माजी आमदार व व्याख्याते ड.जयदेव गायकवाड यांची उपस्थिती लाभली तसेच गायकवाड साहेबांनी भारताचे संविधान या विषयावर मार्मिकपणे विश्लेषण साधून सविस्तर असे भारताचे संविधान कसे सर्वोच्च आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र प्रयत्न करून भारताचे सर्वोच्च संविधान या देशाला अर्पण केले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात धर्मनिरपेक्ष, समता, न्याय,बंधुता या सूत्राची सांगड घालून या देशाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वोच्च असे भारतीय संविधान अर्पण केले व भारतीय संविधान आपल्याला एकसंध ठेवते अशा महामानवाला कोटी कोटी वंदन करून अनमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात दिनांक २६/११/२००८ रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहिद जवानांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माझे अध्यक्ष ॲड.सुनील कडुसकर तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून पि.चि.ॲड.असो.चे मा.अध्यक्ष ॲड.अशोकपाल शर्मा त्याचबरोबर मोठ्या संख्येने वकील वर्ग हजर होता.मा.अध्यक्ष ॲड.नाना रसाळ व मा. अध्यक्ष ड.प्रमिला गाडे, मा.अध्यक्ष सुदाम साने व मा.उपाध्यक्ष प्रतीक जगताप, मा. उपाध्यक्ष गौरव वाळुंज,मा.उपाध्यक्ष गोरख कुंभार ज्येष्ठ विविध ॲड.बी.के कांबळे व ॲड.नारायण थोरात व ॲड.संभाजी वाघमारे व ॲड.राजरतन जाधव ॲड.प्रवीण जगताप ॲड.अतुल कांबळे ॲड.पल्लवी विघ्णे, ॲड.तेजस चौरे ॲड.पल्लवी कुऱ्हाडे व सरकारी वकील वाळके सर ॲड.घोरपडे सर ॲड.प्रताप कडूस ॲड.नितीन कांबळे ॲड.लबडे ॲड.मिलिंद कांबळे ॲड.सुनील माने ॲड.हास्यसम्राट प्रताप साबळे ॲड.मुकुंद ओव्हाळ , ॲड.अधिक चरेगावकर, ॲड.मुस्ताफिज शेख ॲड.जयेश वाकचौरे ॲड .अजय शर्मा ॲड.विक्टर पिंटू ॲड.राजेश रणपिसे ॲड.कुलदीप बकाल ॲड.राजेश पुरोहित अनिल पवार अजित खराडे सागर आडागळे महिंद्रा दांडगे महेश जानकर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् असोसिएशनचें नवनिर्वाचित अध्यक्ष पांडुरंग शिनगारे उपाध्यक्ष अजय यादव सचिव संदीप तापकीर महिला सचिव संगीता कुशलकर सहसचिव पद्मावती पाटील खजिनदार विशाल पोळ हिशोब तपासणीस प्रेरणा चंदानी सदस्य विजय धोंडीराम धोंडे अक्षय चौधरी आरती कुलकर्णी पोर्णिमा मोहिते रुपाली पवार सुषमा पाटील व ईतर असंख्य वकील वर्ग हजर होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.विशाल पोळ यांनी केले तसेच आभार प्रदर्शन ड.संगीता कुशलकर यांनी केले.

# मंदिरातील दानपेट्या फोडणाऱ्या चोरट्याला बेड्या

नारायणगाव । प्रतिनिधी

नारायणगाव परिसरात मंदिरातील दानपेट्या फोडून त्यातील पैसे चोरी करणार्या तसेच दुचाकी चोरी करणार्या चोरट्याला पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्याकडून मंदिरातून चोरलेले पैसे तसेच चार दुचाकी हस्तगत करत चार गुन्हे उघडकीस आणण्यात नारायणगाव पोलिसांनी यश आल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.




नारायणगाव तसेच परिसरात मंदिरातील दानपेट्या फोडण्यासह दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी संबंधित गुन्ह्यांना प्रतिबंध करून गुन्ह्यांची तत्काळ उकल करण्याच्या सूचना नारायणगाव पोलिसांना दिल्या होत्या. दरम्यान, दि. २१ नोव्हेंबरला शिरोली तर्फे आळे गावातील मळगंगामाता मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील अंदाजे एक हजार रुपये रक्कम चोरून नेल्याची तक्रार दत्तात्रय बबन डावकर यांनी नारायणगाव पोलिसांत दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, स्थानिक गुन्हे अन्वेषणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगावचे सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी पोलीस उपनिरीक्षक सोमशेखर शेटे, जगदेव पाटील, पोलीस हवालदार संतोष कोकणे, तनुश्री घोडे, पोलीस शिपाई सत्यम केळकर, गोरक्ष हासे, सुभाष थोरात, सोमनाथ डोके, राम बनकर, नीलेश जाधव यांच्या पथकाची स्थापना केली. गोपनीय माहिती व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या पथकाने भावड्या पथवे याला जेरबंद केले. त्याच्याकडून मंदिरातील दानपेटीतून चोरी केलेले एक हजार रुपये तसेच ८६ हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी हस्तगत केल्या. या चोरट्याकडून पोलिसांनी नारायणगाव, आळेफाटा तसेच रांजणगाव पोलिस ठाणे हद्दीतील चोरीचे चार गुन्हे उघडकीस आणले.

# दादा मुख्यमंत्री व्हावे म्हणुन विठुरायाला घातले साकडे

कुरुळी । प्रतिनिधी

राज्याचा मुख्यमंत्री हा दिल्लीवरून ठरवला जाणार आहे. मात्र कार्यकर्त्यांना आपला नेता मुख्यमंत्री व्हावा अशी आपेक्षा आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता आपल्या परीने उत्साही असल्याचे दिसत आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या भरघोस यशानंतर आता मुख्यमंत्री पदासाठी रस्सीखेच सुरु झाल्याचे पाहायला मिळत आहे. तिन्ही पक्षांचे कार्यकर्ते आपला नेता मुख्यमंत्री व्हावा यासाठी प्रयत्न करताना पाहायला मिळत आहे. त्यातच, अजितदादा मुख्यमंत्री व्हावे म्हणून पिंपरी चिंचवड राष्ट्रवादीचे शहर उपाध्यक्ष अतिश बारणे यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त विठुरायला साकडे घातले आहे. तसेच त्यांनी पंढरपूर येथून तुळशीहार, विणा, शाल, पगडी आणून अजितदादांच्या मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार देखील केला. याप्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य अभिजीत तांबिले, पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष, युवा नेते सतिश बारणे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



# कुरुळी येथे काळभैरवनाथ कालाष्टमी उत्सव साजरा

खेड । प्रतिनिधी

कुरुळी (ता. खेड) येथे श्री काळभैरवनाथ यात्रा व श्री खंडोबा महाराज कालाष्टमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंदिरात पारंपारिक पद्धतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कालाष्टमीनिमित्त गावातील मंदिरांना विद्युत रोषणाई करून मंदिराच्या गाभाऱ्यात विविध प्रकारच्या फुलांची आकर्षक सजावट केली होती. पहाटे ४ ते ६ काकडा आरती, ६ ते ७ अभिषेक महापूजा, त्यानंतर दर्शनासाठी नैवेद्य व श्रीफळ अर्पण करण्यासाठी ग्रामस्थांची गर्दी झाली होती. त्यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यात्रेनिमित्त आमदार बाबाजी काळे, कुरुळीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत, सदस्य, आजी माजी पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या परिसरात पूजेसाठी लागणारे हारतुरे, नारळ, दुकाने, खेळणी, मिठाई, संसारोपयोगी वस्तूंची विक्री करणारी दुकाने थाटण्यात आली होती.

# पुणे जिल्ह्यातील २५९ उमेदवारांच डिपॉजिट जप्त

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघात तब्बल ३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यातील तब्बल २५९ उमेदवारांना अनामत रक्कम वाचविता आली नाही.



जिल्ह्यातील ४४ उमेदवारांची अनामत रक्कम वाचली आहे. त्यात २१ नवनिर्वाचित आमदार व त्यांचे प्रतिस्पर्धी २१ उमेदवार व अन्य दोघांचीच अनामत रक्कम वाचविता आली आहे.

उमेदवाराला मतदारसंघातील एकूण वैध मतांच्या एकषष्ठांश मते म्हणजेच १६.३३ टक्के किंवा त्यापेक्षा कमी मते मिळाल्यास अनामत रक्कम जप्त केली जाते. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ नुसार संसदीय किंवा विधानसभा निवडणूक लढविणार्या प्रत्येक उमेदवाराला निवडणूक आयोगाकडे ठरावीक रक्कम अनामत रक्कम म्हणून जमा करणे बंधनकारक असते. विधानसभेसाठी खुला प्रवर्गासाठी १० हजार तर आरक्षित वर्गासाठी पाच हजार रुपये अनामत रक्कम ठेवली जाते.

जिल्ह्यात सर्वाधिक इंदापूर विधानसभा मतदारसंघातून तब्बल २४ उमेदवार रिंगणात होते. त्यातील २२ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. ८५.४७ टक्के उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. विशेषत: गाजावाजा करत बंडखोरी करणार्या उमेदवाराला अपेक्षित मते मिळाली नसल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील २१ मतदारसंघांत ३०३ उमेदवार रिंगणात होते. त्यातील तब्बल २५९ उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

**या दिग्गजांचा समावेश**

इंदापूर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रवीण माने यांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. तर मनसेच्या चारही उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. त्यात कोथरूड मतदारसंघातील मनसेचे उमेदवार किशोर शिंदे, खडकवासला मतदारसंघातील उमेदवार मयूरेश वांजळे, कोथरूडचे गणेश भोकरे आणि हडपसरचे साईनाथ बाबर यांचा समावेश आहे. याचबरोबर पर्वती मतदासंघातील अपक्ष उमेदवार आबा बागूल, वंचितचे नीलेश आल्हाट यांचा समावेश आहे. पुरंदरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार संभाजी झेंडे यांची अनामत रक्कम थोडक्यात वाचली आहे

# महापालिका प्रशासन लागले कामाला; सर्व विभाग- प्रमुखांना तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश

पुणे । प्रतिनिधी




विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सोमवारी संपुष्टात आली. याबाबत निवडणूक आयोगाकडून महापालिका प्रशासनास पत्र पाठविण्यात आले आहे. आर्थिक वर्षाचे पहिले तीन महिने लोकसभा निवणुकीच्या आचारसंहितेत गेल्यानंतर राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी पुन्हा मागील दीड महिना राज्यात आचारसंहिता होती. त्यामुळे महापालिकेची शेकडो कामे रखडली असून, या कामांना गती येणार आहे. या निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी महापालिकेने सुमारे साडेचारशें कोटींच्या कामांना मान्यता दिली होती. मात्र, अनेक कामांचे कार्यादेश देण्यास महापालिकेस उशीर झाल्याने ही कामे रखडली होती. या कामांना आता वेग येणार आहे.

महापालिकेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च आहे. मात्र, या वर्षी मार्च महिन्यातच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली. ही निवडणूक जवळपास अडीच महिने चालली. त्यामुळे महापालिकेचे अंदाजपत्रक सुरू झाले खरे. मात्र, कोणतीही विकासकामे होऊ शकली नाहीत. त्यामुळे महापालिकेने पुन्हा विधानसभेची आचारसंहिता लागण्याची शक्यता घेऊन जवळपास साडेचारशें कोटींच्या कामांना मान्यता दिली होती. आता ही आचारसंहिता संपली असून, महापालिकेकडे आता केवळ चार महिनेच असल्याने प्रशासनाकडून त्यासाठीची लगबग सुरू करण्यात आली असून, सर्व विभागप्रमुखांना वित्तीय मान्यतेनुसार तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्तांकडून दरवर्षी जानेवारी महिन्यात महापालिकेचे अंदाजपत्रक सादर केले जाते. त्यानुसार आयुक्तांना महापालिकेच्या जमा खर्चाच्या अंदाजपत्रकात २० जानेवारीपूर्वी मिळकतकर वाढीबाबत निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे आयुक्तांकडून पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाची तयारी सुरू करण्यात आली आहे. या वर्षी आचारसंहितेत सुमारे चार महिने गेल्याने, तसेच दोन्ही निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात महापालिकेचे कर्मचारी असल्याने अनेक प्रकल्प आणि कामे मागे पडली असून, त्याचे पडसाद आयुक्तांच्या पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकावर पडण्याची शक्यता आहे.

# आरक्षण हा सामाजिक शाप ठरतोय का? - ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे

पुणे - आपल्या देशात आज लोकशाहीची घुसमट होते आहे. इतिहास बदलला जात आहे. धर्मांध वातावरण तयार केले जाते आहे. सहिष्णुता हा शब्द सामाजिक कोशातून नाहीसा होतो आहे का? एकेकाळी दुर्बल घटकांना योग्य न्याय, संधी मिळावी, या हेतूने निर्माण झालेल्या आरक्षणाचा आज विपर्यास झाला आहे. हे आरक्षण म्हणजे सामाजिक शाप ठरत आहे का? कधी नव्हे एवढी तेढ, एवढा दुजाभाव आढळत आहे, अशी परखड भूमिका ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे यांनी रविवारी व्यक्त केली.




अमोल पालेकर यांच्या ८० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून मधुश्री पब्लिकेशन्सच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'ऐवज' या मराठी आत्मकथनपर पुस्तकाचे, तसेच 'व्ह्यूफाइंडर' या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन सई परांजपे यांच्या हस्ते करण्यात आले. 'दुर्दैवाने मराठी आणि गुजराती रंगभूमी सेन्सॉरच्या कात्रीत सापडली आहे. अनेक चांगल्या कलाकृती रंगमचावर येण्यावर बंधने येत आहेत. मात्र, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची तसदी लेखक, निर्माता, दिग्दर्शक असे संबंधित लोकच घेतात. प्रेक्षकवर्गाने केवळ बघ्याची भूमिका न घेता कणखर आवाजाने सेन्सॉर बोर्डविरोधी चळवळीला पाठिंबा दिला, तर निश्चित श्रेष्ठींना दखल घ्यावी लागेल. जाहीर सभांमधील भडकावू भाषणे, प्रक्षोभक पुस्तकांमधील प्रचार, कशावरही बंधने नाहीत, मग मराठी आणि गुजराती नाटकांनी काय घोडे मारले आहे, असा सवाल परांजपे यांनी या वेळी उपस्थित केला. चित्रपटसृष्टीमध्ये राहूनही अमोल कधी फिल्मी झाला नाही. पुरस्कार न घेणे हाच बंडखोर अमोल पालेकर यांचा विजय आहे, असे परांजपे म्हणाल्या. या प्रकाशनाच्या निमित्ताने कवी बालाजी सुतार यांनी पालेकर यांची मुलाखत घेतली. त्यात त्यांनी आपला जे. जे. कला महाविद्यालय नट ते दिग्दर्शक असा प्रवास सांगितला. संध्या गोखले यांनी आभार मानले. प्रकाशक शरद अष्टेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. विभावरी देशपांडे यांनी मराठी आत्मकथनातील काही भागांचे वाचन केले. मीनाक्षी ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले.

# शाळा चौकातील विठ्ठल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

तळेगाव दाभाडे, - कार्तिकी एकादशी निमित्त शहरातील शाळा चौकातील श्री विठ्ठल मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे पांडुरंगाची महापूजा गणेश भेगडे व त्यांच्या परिवाराच्या वतीने करण्यात आली.



यावेळी काकड आरती, भजन तसेच मंदिरामध्ये दुपारी हरिपाठ घेण्यात आला. दिवसभर मंदिरामध्ये प्रचंड भाविकांची गर्दी झाली होती. कार्तिकीनिमित्त मंदिरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. तर मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंदिरातील सेवेकरी शंकर कांबळे यांचा बबनराव भेगडे व विश्वस्त बाळकृष्ण आरडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन विश्वस्त आरडे, यतीन शहा, शामराव भेगडे, शेखर गुंड, पुरोहित अतुल देशपांडे यांनी केले होते. कार्तिकी महाएकादशी निमित्त ॲड पु वा परांजपे विद्यालयात दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग पोटे, पर्यवेक्षिका रेखा भेगडे यांनी याचे नियोजन केले होते. हभप नितीन महाराज काकडे यांची प्रवचन सेवा संपन्न झाली. नवीन समर्थ विद्यालयात मुख्याध्यापिका वसंती काळोखे व पर्यवेक्षक शरद जांभळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# कात्रजमध्ये गांजा जप्त; तरुणाला अटक

पुणे । प्रतिनिधी

गांजा तस्करीच्या तयारीत असलेल्या एकाला अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून दोन लाख ४३ हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला.

देव नरेश तनेजा (वय २४) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. अमली पदार्थ विरोधी पथक दोनचे पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि पथक भारती विद्यापीठ परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी एक जण कात्रज चौकात गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिस कर्मचारी संदीप शेळके यांना मिळाली. पोलिसांनी सापळा लावून तनेजाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेल्या पिशवीची तपासणी करण्यात आली. तेव्हा पिशवीत गांजा सापडला. तनेजाकडून अडीच लाख रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला.

पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, योगेश मांढरे, चेतन गायकवाड, नितीन जगदाळे, युवराज कांबळे, संदीप जाधव, उदय राक्षे, दिशा खेवलकर, साहिल शेख, अझिम शेख, आझाद पाटील, नीलम पाटील यांनी ही कामगिरी केली.

# रेल्वेचे वेळापत्रक अजूनही कोलमडलेलेच

पुणे, - दिवाळीनंतरही रेल्वेचे बिघडलेले वेळापत्रक रूळावर येत नसल्याचे दिसून येत आहे. मागील दोन दिवसांमध्ये पुण्यातून सुटणाऱ्या नऊ ते दहा ट्रेन्सना दोन ते नऊ तासांपर्यंत उशीर झाला. त्यामुळे प्रवाशांना रेल्वे स्थानकावर ताटकळत थांबावे लागत आहे. यामध्ये लांब पल्ल्याच्या ट्रेन्सचा समावेश आहे.



पुणे रेल्वे विभागातून दररोज दोनशे ट्रेन्स धावतात. त्यामधून साधारण पावणेदोन लाख नागरिक प्रवास करतात. रेल्वेकडून ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्ये दिवाळी व छट पूजेसाठी तीनशेपेक्षा अधिक विशेष ट्रेन्स सोडल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांची सोय झाली. पण, ट्रेन्सची संख्या वाढल्यामुळे वेळापत्रक दिवाळीमध्ये काहीसे विस्कळीत झाले. दिवाळीनंतर हे वेळापत्रक सुधारेल असे वाटत असताना, महिनाअखेरीसही वेळापत्रक बिघडलेलेच आहे. पुणे रेल्वे स्थानकावरून रविवारी लांब पल्ल्यांच्या सुटणाऱ्या सहा ट्रेन्सना चार ते आठ तासांपर्यंत उशीर झाल्याचे दिसून आले. त्यापैकी काही ट्रेन्स नियमित सुटणाऱ्या तर काही ट्रेन्स विशेष होत्या. तर, सोमवारीही दोन ट्रेन्सना उशीर झाला. त्यामध्ये पुणे-मुझफ्फरपूर, पुणे-नागपूर आणि पुणे-हमसफर एक्स्प्रेसला सात ते नऊ तासापर्यंत उशीर झाला. तर पुणे-नांदेड, हडपसर-झांशी विशेष, पुणे-मालदा विशेष, पुणे-हरंगुळ ट्रेन्सना तीन ते सहा तास उशीर झाला. त्यामुळे प्रवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागला.

cmyk